DAILY THANEVAIBHAV RNI REGD NO. 27878/ 75, POSTAL NO. THC/186/2018-2021

कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, मीरा-भाईंदर, अंबरनाथ-बदलापूर, भिवंडी, उल्हासनगर, मुरबाड, शहापूर.

आतील पानांत

"जोपर्यंत युद्ध चालू आहे, शस्त्र खाली ठेवू नका"; पंतप्रधानांनी देशाला केले सावध

अखेर सैन्यातील ३९ महिला अधिकाऱ्यांना हक्क मिळाला

मौनाचा आक्रोश कोणी ऐकेल का ?

अग्रलेख / 5

www.thanevaibhav.in

# ठाणेवैभव

ठाणे जिल्ह्याचे सर्वाधिक खपाचे परिपूर्ण दैनिक | इष्ट ते छापणार | संस्थापक : नरेन्द्र बल्लाळ




अंबरनाथ-बदलापूर वैभव विशेष

➤➤पान ५ वर

भारतीय सौर दिनांक कार्तिक १ शके १९४४ | वर्ष ४७ | अंक ५७ | शनिवार २३ ऑक्टोबर २०२१ | पाने ६ | रु. ४

संपादक : मिलिन्द बल्लाळ

## थोडक्यात

### पहिली ते चौथीचेही वर्ग भरणार

**शिक्षणमंत्र्यांनी घेतली आढावा बैठक**

**मुंबई:** आठवी ते बारावीचे वर्ग सुरु झाल्यानंतर राज्यातील महाविद्यालयांनाही कोरोनाचे नियम पाळत सुरु करण्याची परवानगी दिली. आता राज्यात सरसकट पहिलीपासून शाळा सुरु करण्याबाबत हालचाली सुरु झाल्याची माहिती समोर आली आहे.

पहिली ते चौथी शाळा सुरु करण्यासाठी शिक्षण विभागाचे अधिकारी सकारात्मक असल्याचं समोर आलं

➤➤पान २ वर

### अखेर 'त्या' फेरीवाल्याविरोधात गुन्हा दाखल

**ठाणे:**महापालिका आयुक्तांच्या बंगल्याजवळ कारवाईला गेलेल्या माजीवडा मानपाडा प्रभाग समितीच्या अतिक्रमण विभागाचे लिपिक काशीनाथ राठोड यांच्यावर सुरा उगारणाऱ्या हरिभाऊ हुले या फेरीवाल्याविरोधात कासारवडवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

➤➤पान २ वर

### कल्पिता पिंपळे आणि अंगरक्षकाला प्रत्येकी पाच लाखांची मदत

**ठाणे :** फेरीवाल्याच्या हल्ल्यात जखमी झालेल्या ठाणे महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त कल्पिता पिंपळे आणि त्यांचा अंगरक्षक सोमनाथ पालवे यांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून प्रत्येकी पाच लाखांचे अर्थसहाय्य जाहीर झाले आहे.

मुख्यमंत्री कार्यालयातून ठाणे जिहाधिकारी यांना पत्र प्राप्त झाले आहे. फेरीवाल्यांवरील कारवाईच्या दरम्यान कल्पिता पिंपळे यांच्यावर प्राणघातक हल्ला

➤➤पान २ वर

# मूक आंदोलनाने दणदणणार कडोंमपाचा औद्योगिक परिसर

## वीज गूल, रस्ते खड्ड्यात, अस्वच्छता, पाण्याचा ठणठणाट...

**डोंबिवली: विविध कर देऊनही पाणी, वीज, रस्ते, स्वच्छता अशा समस्यांनी औद्योगिक भागातील सर्वसामान्य कल्याण-डोंबिवलीकर त्रस्त झाले असून त्यांनी उत्स्फूर्तपणे एकत्र येत रविवारी अराजकीय मूक आंदोलनाचे शिस्तबद्ध आयोजन केले आहे.**



**या भागातील नागरिक रविवार 24 ऑक्टोबर 2021 रोजी मूक आंदोलन करणार असून, कोविडच्या पार्श्वभूमीवर हे आंदोलन करताना कोणतीही गर्दी होणार नाही याची काळजी घेण्यात येणार आहे. त्यापद्धतीने सूचना नागरिकांना वेळोवेळी देण्यात येत आहेत. सर्व नागरिक रस्त्याच्या दुतर्फा दहा दहा फुटाच्या अंतरावर निषेध फलक घेऊन उभे राहतील अशी रचना करण्यात आली आहे.**

> **"आम्ही आमचे कर्तव्य बजावत आहोत. आम्ही सर्व बिले वेळेवर भरतो, पण आम्हाला आमचे हक्क वेळेवर मिळत नाहीत. त्यासाठी दक्ष नागरिक मंचाच्या माध्यमातून आम्ही हा लढा देत आहोत, असे विनायक धुपकर यांनी सांगितले.**

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील औद्योगिक विभागातील नागरिक गेली अनेक वर्षे खड्डेमय रस्ते, अनियमित आणि अनियंत्रित पाणीपुरवठा, प्रलंबित मलनिस्सारण रचना, विजेचा लपंडाव आणि स्वच्छता या महत्वाच्या समस्यांवर तोडगा काढावा यासाठी प्रशासनाकडे पाठपुरावा करीत आहेत. परंतु त्यांच्या या सर्व मागण्यांवर कोणतीही ठोस कारवाई होत नसून परिस्थितीत सुधारणा होताना दिसत नाही. या भागातील विकासकामांची जबाबदारी कल्याण डोंबिवली महापालिका, एमआयडीसी व वीज वितरण कंपनी या तीन प्रशासकीय विभागांकडे आहे. परंतु प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत आहे परिणामी याचा त्रास करदाते नागरिकांना होत आहे. यामुळे अखेर कंटाळून औद्योगिक विभागातील

➤➤पान २ वर

> **"नागरिकांनी केलेले हे उत्स्फूर्त आंदोलन आहे. नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. समस्यांची माहिती करून देण्यासाठी हा एक वेगळा मार्ग आहे, असे मंचाचे अतुल रायकर यांनी सांगितले.**

> **"मूलभूत सुविधा निवासी भागात मिळत नाहीत. मुख्य म्हणजे विद्युत पुरवठा व चांगले रस्ते मिळत नाहीत म्हणून प्रशासनाविरुद्ध आम्ही सर्वजण एकत्र येऊन आंदोलन करत आहोत. हे आमचे आंदोलन अराजकीय आहे, अशी प्रतिक्रिया केदार पाध्ये यांनी दिली.**

# कल्याण-डोंबिवलीत ४१ प्रभागांतून निवडले जाणार १२२ नगरसेवक

## महापालिकेची निवडणूक प्रथमच पॅनेल पध्दतीने

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या आगामी निवडणुका आता तीन सदस्य प्रभाग रचनेनुसार होणार आहेत, त्यामुळे प्रत्येक मतदाराला तीन उमेदवारांना मतदान करावे लागणार आहे. एकूण असे 41 प्रभाग होणार असून चाळीस प्रभाग तीन तर एक प्रभाग दोन सदस्यांचे असणार आहे. यातून एकूण 122 नगरसेवक निवडले जाणार आहेत.

गेल्या तीन निवडणुकात त्या प्रभागाचे आरक्षण काय होते



याचा विचार करून आरक्षण सोडत केली जाते. पन्नास टक्के प्रभाग महिलांसाठी म्हणजेच 41 प्रभागात 61 महिला असणार आहेत. उरलेली आरक्षणे इतरांसाठी असतील, अशी माहिती केडीएमसी सचिव संजय जाधव यांनी दिली.

प्रभाग रचना ही अत्याधुनिक संगणकीय पद्धतीने होते. त्यामुळे कुणाच्या दबावाखाली किंवा सोयीस्कर फायद्याची होते हे आरोप बिनबुडाचे आहेत. तसेच खासगी ठेकेदार प्रभाग रचना करणार हेही चुकीचे आहे. प्रभाग रचना मतदार संख्येवर नव्हे तर लोकसंख्येवर आधारित होते. संपूर्ण केडीएमसीची जनगणना किती आहे त्यावर

➤➤पान २ वर




GOKHALE RD THANE W. SAREE 98928 95161 DRESS 90825 87875 www.kalamandirsarees.com



**कोरोनाचे संकट कमी होत चालल्याने शुक्रवारपासून चित्रपटगृहे सुरु करण्याचे शासनाने जाहीर केले होते, मात्र आज पहिल्याच दिवशी प्रेक्षकांचा प्रतिसाद न मिळाल्याने चित्रपटगृहे ओस पडल्याचे पहावयास मिळाले. उद्यापासून प्रेक्षक येऊ लागतील असा विश्वास अंबरनाथमधील चित्रपटगृहाच्या संचालकांनी व्यक्त केला.**


### मीरा-भाईंदर शहरात 15 हजार अनधिकृत नळजोडण्या

**आमदार प्रताप सरनाईक यांचा आरोप**

**भाईंदर :** मीरा-भाईंदर शहरात मागील तीन वर्षाच्या काळात 10000 अधिकृत नळजोडण्या देण्यात आलेल्या असून सत्ताधारी भाजपा आणि मनपा प्रशासनाच्या संगनमताने जवळजवळ 15 हजार अनधिकृत नळजोडण्या देण्यात आल्याचा गौप्यस्फोट शिवसेना आमदार प्रताप सरनाईक यांनी आज एका पत्रकार परिषदेत केला.

मीरा-भाईंदर शहराला 135 दशलक्ष लिटर्स पाणी पुरवठा एमआयडीसीकडून मंजूर झाल्यानंतर 2017 पासून नविन नळजोडण्या

➤➤पान २ वर



**श्री. आणि सौ. मूर्ती**

"गेले काही वर्षे आम्ही ठाण्यात भाड्याने राहत आहोत. त्यामुळे आम्ही फ्लॅट्स पाहतच होतो. अनेक फ्लॅट्स पाहिल्यानंतर लक्षात आलं रूम खूपच छोट्या वाटल्या. परंतु ज्यावेळी आम्ही ऋतू रिचमंड मधील फ्लॅट्स पाहिले त्यावेळी आम्ही आमचे नवीन घर घेण्यास लगेच तयार झालो. कारण येथील १ बीएचके फ्लॅट्समध्ये सुद्धा मोठी आणि सुटसुटीत अशी जागा आम्हाला बघायला मिळाली. फ्लॅटची उंची आणि कार्पेट एरिया देखील उत्तम प्रकारे मिळाला आहे. प्रत्येक रूमला बाल्कनी देण्यात आली आहे. सर्वच फ्लॅट उत्तम पद्धतीने तयार करण्यात आले आहेत. म्हणूनच आम्ही ऋतू रिचमंडमध्ये स्वतःचे घर घेतल्याचा खूप आनंद होत आहे.

**ऋतू सिटी रिचमंड**

डी मार्ट जवळ, कावेसर, घोडबंदर रोड, ठाणे (प) ४००६०७

संपर्क : ७६६६३१०३६० / ८६५५९४४९९९

RUTU™ Group of Companies

Built for life... since 1979

### ठाकरे सरकारकडून मराठा समाजाचा विश्वासघात-आमदार संजय केळकर

# वसतिगृहाच्या नामफलकावरून 'मराठा' शब्द वगळला

**ठाणे:** ठाणे शहरात उभारण्यात आलेले डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करण्याचा शब्द सरकारच्यावतीने देण्यात आला होता. मात्र, मराठा समाजाचा उल्लेख वगळून शासनाने जाहिरात काढल्याने मराठा समाजात संतापाची लाट उसळली आहे. पालकमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी एकप्रकारे मराठा विद्यार्थ्यांचा विश्वासघात केल्याची टीका आमदार संजय केळकर यांनी केली आहे.

मराठा आरक्षणासह जिल्ह्याजिल्ह्यात मराठा विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहे उभारावीत, यासाठी मराठा समाजाने लाखोंचे

➤➤पान २ वर

**ठाकरे सरकारचे दुटप्पी धोरण**

**ठाण्यातील वसतीगृह मराठा समाजासाठी असल्याच्या वल्गना ठाण्यातील मंत्र्यांनी केल्या होत्या,परंतु मंत्री एकनाथ शिंदे यांनी शब्द पाळला नाही. वसतीगृह इतर विद्यार्थ्यांना देण्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. मात्र, जाणुनबुजुन जाहिरातीत मराठा समाजाला डावलणे, म्हणजे सरकारचे हे दुटप्पी धोरण आहे, असे मराठा नेते सीताराम राणे यांनी म्हटले आहे.**

### बाजार समितीच्या आवारात उभारणार कचरा प्रक्रिया प्रकल्प

# कृषी उत्पन्न बाजार समिती करणार कचऱ्यापासून खत निर्मिती

**कल्याण :** कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये रोज शेकडो गाड्या फळ, भाज्या, फुले आणि धान्याची आवक होत असते. यातून सुमारे पाच टन कचरा निर्माण होत असतो. महानगरपालिकेने देखील डम्पिंग ग्राउंड बंद केल्याने आता कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणार असून यातून खत निर्मिती केली जाणार आहे. यामुळे बाजार समितीच्या आवारातच कचऱ्याची विल्हेवाट लागणार असल्याची माहिती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती कपिल थळे यांनी दिली.

कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये



महापालिका आणि बाजार समिती यांच्यात कचऱ्या उचलण्याच्या वादातून अनेक वेळा याठिकाणी कचऱ्याचे ढीग पाहायला मिळतात. महापालिकेने डम्पिंग ग्राउंड बंद केल्याने त्या अनुशंगाने ठराव घेऊन स्वताचा कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात येत असून या ठरावाला

➤➤पान २ वर

**स्व. श्री. अनंत वामन तरे साहेब (दादा)**

यांच्या जयंती निमित्त




वीर बजरंग मित्र मंडळ, साई सेवक मित्र मंडळ (आनंदपार्क), नवतरुण मित्र मंडळ (आझादनगर) आणि शिवसेना शाखा आझाद नगर, आनंद पार्क, श्रीरंग, वृंदावन, गोकुळनगर, राबोडी व खोपट यांच्या सहकार्याने आयोजित

**मोफत आरोग्य चिकित्सा शिबिर**

उद्घाटन : मा. हेमलता अनंत तरे यांच्या शुभहस्ते

ठिकाण : तरे साहेबांच्या कार्यालयाजवळ, देवी मंडप, आनंद पार्क

दिनांक : शनिवार, २३ ऑक्टोबर २०२१ रोजी

सकाळी १०.३० ते २.३० वाजेपर्यंत

आयोजक : संजय वामन तरे, मा. नगरसेवक, अध्यक्ष - राबोडी कोळीवाडा नागरिक संघटना

सौ. महेश्वरी संजय तरे, मा. नगरसेविका

जयेश अनंत तरे - अध्यक्ष, महाराष्ट्र कोळी समाज संघ

पायलट विशाल संजय तरे

| | |
|---|---|
| डॉ. प्राजक्ता जयेश तरे (एमडी-होमियोपॅथी) Consulting Homoepath | मधुमेह, संधिवात, पोटाचे पचनाचे विकार, मुळव्याध, मुतखडा, वंध्यत्व, ॲलर्जी, सायाटिका, जुनाट सर्दी, लहान मुलांच्या तक्रारी, कमी प्रतिकार शक्ती, महिलांच्या समस्या (P.C.O.D. मासिक पाळीतील समस्या) थायरॉईड इत्यादी समस्यांवर मोफत सल्ला व औषधे देण्यात येतील. |
| डॉ. जस्मीन अवधूत राजके (दंत चिकित्सक) | मोफत दंत चिकित्सा व उपचार 1) Complete Oral Helath Check - up 2) Anti - Tobacco and Anti - Smoking Awareness Drive |
| डॉ. दक्षता अनंत तरे (एमडी-डर्माटोलॉजिस्ट) | मोफत त्वचा आणि केस अनालिसिस टेस्ट त्वचाविकार, केस व नखांसंबंधीत विकारांवर मोफत सल्ला व उपचार |
| डॉ. आकांक्षा संजय तरे (एम.बी.बी.एस.) | जनरल हेल्थ चेक -अप |

महत्वाची सूचना : विभागातील १८ वर्षांवरील नागरिकांसाठी मोफत कोविड लसीकरण

वेळ : सकाळी १०.३० ते २.३० वाजेपर्यंत, तरे साहेबांच्या कार्यालयाजवळ, देवी मंडप, आनंद पार्क

# जिल्हयात सोमवारपासून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या लसीकरणासाठी युवा स्वास्थ मोहिम

**ठाणे:** महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना कोरोना प्रतिबंधात्मक लसीचे संरक्षण मिळावे यासाठी आरोग्य विभागामार्फत सोमवार 25 ऑक्टोबर ते 2 नोव्हेंबर 2021 या कालावधीत मिशन युवा स्वास्थ मोहिमेअंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे लसीकरण करण्यात येणार आहे. त्यासाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयात अपर जिल्हाधिकारी वैदेही रानडे यांनी आढावा बैठक घेतली.

दुरदृष्य प्रणालीच्या माध्यमातुन झालेल्या या बैठकीत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनीष रेंघे, जिल्हा लसीकरण अधिकारी डॉ. अंजली चौधरी यांच्यासह तालुका आरोग्य अधिकारी, महाविद्यालयांचे प्राचार्य सहभागी झाले होते.

जिल्ह्याच्या ग्रामीण भागात अंबरनाथ येथे 9, कल्याण येथे 7, भिवंडी येथे 17, शहापूर येथे 14 तर मुरबाड येथे 10 अशी एकूण सुमारे 57 महाविद्यालये असून त्यातील प्राचार्य आजच्या बैठकीत सहभागी झाले होते. यावेळी अपर जिल्हाधिकारी वैदेही रानडे यांनी मिशन युवा स्वास्थ मिशन बाबत माहिती दिली आणि ही मोहीम यशस्वी करून युवा वर्गाला कोरोना लस देऊन संरक्षित करण्यासाठी महाविद्यालयांनी पुढाकार घेण्याचे आवाहन श्रीमती रानडे यांनी केले. या मोहिमेत 100 टक्के विद्यार्थ्यांना पहिला डोस देण्याचे उद्दिष्ट ठेवावे, असेही त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी जर पहिला डोस याआधी घेतला असेल तर त्याविषयीची स्वतंत्र यादी महाविद्यालयांनी सादर करण्याचे श्रीमती रानडे यांनी सांगितले.

20 ऑक्टोबरपासून महाविद्यालये सुरु झाली असून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना कोरोना प्रतिबंधात्मक लसीचे कवच मिळावे यासाठी आरोग्य आणि उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या समन्वयातून ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी आणि महापालिका आयुक्त या मोहिमेचे नियंत्रण करणार आहेत.

# शिक्षक परिषदेची पुणे शिक्षण आयुक्तालयावर धडक

## आमदार संजय केळकर यांच्या उपस्थितीत लाक्षणिक उपोषण

**ठाणे:** शिक्षकांच्या न्याय हक्कांसाठी तीव्र लढा उभारण्यासह येत्या हिवाळी अधिवेशनात आवाज उठवण्याचा निर्धार महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे संस्थापक ठाण्याचे आमदार संजय केळकर यांनी व्यक्त केला.

राज्यभरातील प्राथमिक शिक्षकांच्या प्रलंबित 11 मागण्यांसाठी शिक्षक परिषदेने गुरुवारी थेट पुण्यातील शिक्षण आयुक्तालयावर धडक मारली. तसेच, आमदार केळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करून प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

पुणे येथील शिक्षण आयुक्त कार्यालयाबाहेर आ. संजय केळकर यांच्या उपस्थितीत गुरुवारी पार पडलेल्या या लाक्षणिक उपोषणाला शिक्षक परिषदेचे प्राथमिक विभागाचे राज्य नेते रावसाहेब रोहोकले, राज्याध्यक्ष राजेश सुर्वे, कार्यवाह सुधाकर मस्के, कोषाध्यक्ष संजय पगार, कार्याध्यक्ष मधुकर उन्हाळे, बाबुराव पवार, उपाध्यक्ष प्रकाश चतरकर, कार्यालयीन मंत्री भगवान घरत आदीसह मोठ्या संख्येने मान्यवर उपस्थित होते. विशेष म्हणजे धुळ्याच्या आमदार मंजुळाताई गावित आणि धुळे जिल्हा शिवसेनाप्रमुख तुळशीराम गावीत यांनीही उपोषणाला सदिच्छा भेट दिली.

यावेळी शिक्षण संचालक दिनकर टेमकर यांना परिषदेच्यावतीने निवेदन देण्यात आले. निवेदनात इयता 1 ली ते 4 थीच्या शाळा नियमित सुरू करण्यासह विद्यार्थ्यांचा उपस्थिती भत्ता, शिक्षकांचे वेतन, कोविड लाभ आदी 11 मागण्या करण्यात आल्या आहेत.

पान १ वरुन

## मूक आंदोलनाने दणदणणार कडोंमपाचा औद्योगिक परिसर

नागरिकांनी रविवार 24 ऑक्टोबर रोजी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

डोंबिवली औद्योगिक विभागातील निवासी विभाग दक्ष नागरिक मंचच्या समूहाने या भागात राहणाऱ्या अनेक नागरिकांसोबत चर्चा करून या परिस्थितीबाबत संबंधित प्रशासकीय यंत्रणांना जाब विचारण्यासाठी आंदोलनाची भूमिका घेण्याचा निर्णय घेतला आहे.

या भागातील नागरिक रविवार 24 ऑक्टोबर 2021 रोजी मूक आंदोलन करणार असून, कोव्हिडच्या पार्श्वभूमीवर हे आंदोलन करताना कोणतीही गर्दी होणार नाही याची काळजी घेण्यात येणार आहे. त्यापद्धतीने सूचना नागरिकांना वेळोवेळी देण्यात येत आहेत. सर्व नागरिक रस्त्याच्या दुतर्फा दहा दहा फुटाच्या अंतरावर निषेध फलक घेऊन उभे राहतील अशी रचना करण्यात आली आहे.

आंदोलनासाठी डोंबिवली औद्योगिक निवासी विभाग दक्ष नागरिक मंचच्या वतीने पुढाकार घेण्यात आला असून हा मंच पूर्णतः अराजकीय असून, सकारात्मक दृष्टिकोन ठेऊन दबावगट म्हणून काम करणाऱ्या नागरिकांचा समूह असल्याची माहिती दक्ष नागरिक मंच औद्योगिक परिसरचे विजय मेटकर, अतुल रायकर, वैभव जोशी,अतुल मोडक यांनी दिली.

विशेष म्हणजे दर महिन्यात 2 ते 3 वेळा या भागाला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिन्या फुटतात आणि त्यामुळे त्या नंतर तीन ते चार दिवस कमी दाबाने आणि अपुरा पाणीपुरवठा होत असल्याचा येथील नागरिकांचा अनुभव आहे. खड्डेमय रस्ते ही समस्या तर पूर्ण डोंबिवलीची असून इथल्या नागरिकांनी गेले अनेक वर्षे याबाबत आवाज उठवला आहे. अनेक वेळा रस्त्यांसाठी निधी मिळाल्याच्या बातम्या नागरिकांपर्यंत येतात पण याबाबतची जबाबदारी एकमेकांवर ढकलण्यात येते.

## कल्याण-डोंबिवलीत 41 प्रभागांतून निवडले जाणार 122 नगरसेवक

अवलंबून प्रभाग रचना निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार करण्यात येते. निवडणुकीचा पाया ही जनगणना आहे. जनगणनेत प्रगणक गटनिहाय लोकसंख्या मोजली जाते. त्याच प्रगणक गटनिहाय गूगल अर्थ नकाशावर उत्तरेकडून पूर्वेकडे अशा पद्धतीने निवडणूक आयोगाने ठरवून दिलेल्या लोकसंख्यानुसार प्रभाग रचना करण्यात येत असल्याची माहिती संजय जाधव यांनी दिली.

अनुसूचित जाती व जमातीच्या लोकसंख्या नोंदीनुसार प्रभाग आरक्षित केले जातात. उरलेले बीसीसी आरक्षण म्हणजेच नागरिकांचा मागास प्रवर्ग व खुला प्रवर्ग असे सोडत काढून आरक्षित केले जातात. त्यात पन्नास टक्के महिलांसाठी आरक्षण आहे. प्रभाग रचना करायला कोणतीही एजन्सी नाही आहे. त्याच्या तांत्रिक कामासाठी गुगल अर्थवर मॅपिंग करून मूळ प्रगणक गट जिकडे आहेत त्या जागेवरच बसणार. त्यासाठी तांत्रिक सल्लागार समिती निवडणूक आयोगाच्या सूचना पाळून हे काम करते. प्रभाग रचनेत नॅशनल हायवे, नद्या, नाले, डीपी रोड तोडायचे नसतात. भौगोलिक सलगता पाहूनच रचना केली जाते.

मतदार याद्या विधानसभानूसार वापरल्या जातात. महापालिकेच्या स्वतःच्या मतदार याद्या नसतात. महानगरपालिका यादी बनवताना त्या याद्या उचलल्या जातात आणि प्रभाग रचनेनुसार त्यातील मतदार यादी भाग संदर्भ वेगळे करून एकत्र यादी केली जाते. विधानसभा यादीत असलेले प्रत्येक नाव पालिका यादीत येतेच. एका प्रभागात नसेल तर शेजारी प्रभागात नक्की असते. यासाठी निवडणुकी पूर्वी प्रारूप यादीत मतदारांनी आपले नाव तपासणे आहे व नसल्यास हरकत घेऊन ते योग्य यादीत येण्यासाठी सतर्क राहणे गरजेचे असल्याचेही संजय जाधव यांनी सांगितले.

## वसतिगृहाच्या नामफलकावरून 'मराठा' शब्द वगळला

मोर्चे काढले. त्यानंतर ठाण्यातील पोखरण रोड नं 2 येथे ठाणे महापालिकेने महाराष्ट्रातील पहिले मराठा वसतीगृह उभारल्याचा दावा केला होता. 15 ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनी डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृहाचा लोकार्पण सोहळा पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा संघटनांच्या तसेच खासदार कुमार केतकर, आमदार संजय केळकर, आ. निरंजन डावखरे आदींच्या उपस्थितीत केले होते. लोकार्पणदिनी बॅनरवर देखील डॉ. पंजाबराव देशमुख मराठा वसतीगृह असा उल्लेख करण्याबरोबरच या वसतीगृहात मराठा मुलामुलींना प्रवेश देण्याची संपूर्ण जबाबदारी सरकारची असणार असल्याचा शब्द पालकमंत्र्यांनी दिला होता. मात्र, प्रत्यक्षात वसतीगृहाच्या नामफलकावरून 'मराठा' शब्द वगळण्यात आला. याबाबत सातत्याने मराठा क्रांती मोर्चाचे रमेश आंब्रे यांनी आक्षेप नोंदवुनही आजपावेतो दखल घेतलेली नाही. आता तर शासनाने काढलेल्या जाहिरातीत 'मराठा' विद्यार्थ्यांचाही उल्लेख टाळला आहे. शासनाच्या जाहिरातीत आर्थिक दुर्बल मुलींसाठी वसतीगृहातील सोईसुविधा पुरवण्यासाठी देकार मागवल्याने मराठा संघटना आक्रमक झाल्या आहेत.

रमेश आंब्रे यांच्यासह सीताराम राणे, ॲड.अल्केश कदम, प्रशांत मोरे, निलेश महाडीक, ज्ञानदीप जाधव, हनुमंत कदम, शैलेश कदम आदी मराठा समाजबांधवांनी संताप व्यक्त करीत आमदार संजय केळकर यांची भेट घेऊन भावना व्यक्त केल्या. त्यानंतर आ. केळकर यांनी जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांच्या निदर्शनास ही चूक आणून दिल्याने प्रशासनाने यासंदर्भात सुधारीत जाहिरात काढण्याचे आश्वासन दिले.

याबाबत बोलताना आ.केळकर यांनी, जाहिरातीत मराठा विद्यार्थ्यासाठी जागा आरक्षित केल्याचा उल्लेखच नसल्याने शासन मराठा समाजाची दिशाभूल करीत असल्याचे म्हटले. पालकमंत्री एकनाथ शिंदे हे वसतीगृह मराठा विद्यार्थ्यांसाठी असल्याचे जाहिर करतात. मात्र,प्रत्यक्षात मराठा विद्यार्थ्यांशी विश्वासघात करीत असल्याची टीकाही आ.केळकर यांनी केली.

## कृषी उत्पन्न बाजार समिती करणार कचऱ्यापासून खत निर्मिती

18 ऑक्टोबर रोजीच्या सभेत मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे लवकरच बाजार समिती स्वतःच कचऱ्यापासून खतनिर्मिती प्रकल्प उभा करणार असल्याने कचऱ्याचा प्रश्नच राहणार नाही.

कचऱ्याचा जो काही प्रश्न दिसतो तो फुलमार्केटमधील जे गाळे महापालिकेच्या ताब्यात आहेत, ज्यांचं भाडं, टॅक्स महापलिका घेते, ते त्यांचा कचरा उचलत नाहीत त्यामुळे त्याठिकाणी कचरा दिसत असतो. बाजार समितीचा जो कचरा आहे तो नियमितपणे कंत्राटदारामार्फत उचलला जात आहे. कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अंतर्गत अन्नधान्य बाजार, भाजीपाला बाजार, फुल बाजार, बैलबाजार यामधून एकूण 5 टन कचरा निर्माण होतो. त्यामध्ये पालेभाज्यांचा कचरा उचलण्यासाठी वेगळा ठेकदार नेमला असून पशुखाद्यासाठी हा कचरा उचलला जातो. त्यामुळे त्याची विल्हेवाट लावण्याची आवश्यकता नसते. इतर जो कचरा आहे त्याची विल्हेवाट लावण्यासाठी 5 टन क्षमता असलेला कचरा प्रक्रिया प्रकल्प सुरु करत असल्याने यापुढे कृषी उत्पन्न बाजार समितीमधील कचऱ्याची समस्या उद्भवणार नसल्याची माहिती सभापती कपिल थळे यांनी दिली.

## मीरा-भाईंदर शहरात 15 हजार अनधिकृत नळजोडण्या

देण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली. यापुर्वी या शहराचा पाणी पुरवठा लक्षात घेता प्रशासनाने 2010 पर्यंत केवळ 35000 नळजोडण्या मंजूर केल्या होत्या. मात्र 2017 पासून येत्या तीन वर्षाच्या काळात 10000 अधिकृत नळजोडण्या मंजूर केल्या आहेत. यामध्ये सत्ताधारी भाजपाने या शहरात नव्याने उभारण्यात आलेल्या इमारतींना तसेच त्यांच्याशी संबंधित असलेले हॉटेल्स, शाळा, बीयर बार आदिंना देखील नळ कनेक्शन मंजूर केलेले आहेत. या नळ कनेक्शनची संख्या लक्षात घेता झोपडपट्टी वासियांना पुरेसा पाणी पुरवठा केला गेला असता असेही आमदार प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

मीरा-भाईंदर शहरात नव्याने उभारण्यात आलेल्या इमारतींना नविन नळ कनेक्शन मंजूर करताना विकासकांकडून नळ जोडणीचा खर्च वसूल करायला हवा होता. मात्र या विकासकांकडून नळ जोडणी करताना प्रति चौरस फुटामागे 50 रुपये याप्रमाणे पाणी पुरवठा विभागाने बेकायदेशीर वसुली केली आहे. पाणी पुरवठा विभागाचा मेस्त्री संजय सोनावणे याचा यामध्ये मोठा हात असून या माध्यमातून त्याने कोट्यावधीची संपत्ती गोळा केली आहे. या सोनावणेची आयुक्त दिलीप ढोले यांनी कसून चौकशी करावी. अन्यथा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे त्याच्या विरोधात लेखी तक्रार करावी लागेल, असा इशारा सरनाईक यांनी दिला आहे.

## कल्पिता पिंपळे आणि अंगरक्षकाला प्रत्येकी पाच लाखांची मदत

करण्यात आला होता. यामध्ये त्यांच्या हाताची दोन बोटे तुटली होती. तर अंगारक्षकाचे देखील एक बोट तुटले होते. विशेष बाब म्हणून त्यांना हे अर्थसहाय्य करण्यात येत आहे.

ठाणे महापालिकेच्या माजिवडे-मानपाडा प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्त कल्पिता पिंपळे यांच्यावर दोन महिन्यापूर्वी फेरीवाल्यांच्या कारवाई दरम्यान हा हल्ला झाला होता. कासारवडवली येथील भाजीमार्केटमध्ये कारवाई करत असताना अचानक एका फेरीवाल्याने चाकूने त्यांच्यावर हल्ला चढवला. डोक्यावर वार होऊ नये यासाठी त्यांनी हात वर केल्यानंतर चाकूचा वार त्यांच्या हातावर आणि काही प्रमाणात डोक्यावर झाला. मात्र या हल्ल्यात त्यांना त्यांची दोन बोटे गमवावी लागली. तर हल्ल्यात त्यांचा सुरक्षा रक्षक सोमनाथ पालवे यांचे देखील एक बोट तुटले. पिंपळे यांच्यावर ठाण्यात एका खाजगी रुग्णालयात उपचार करण्यात आल्यानंतर त्यांना घरी सोडण्यात आले असून सध्या त्या घरीच आहेत.

कल्पिता पिंपळे या रुग्णालयात दाखल असताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी स्वतः त्यांची दूरध्वनीद्वारे चौकशी केली होती. तसेच दोषींच्या विरोधात कडक कारवाई केली जाईल असे आश्वासन देखील त्यांनी दिले होते. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी देखील त्यांची रुग्णालयात जाऊन विचारपूस केली होती. आता दोन महिन्यानंतर त्यांना आणि त्यांच्या अंगरक्षकाला मुख्यमंत्री सहायता निधीमधून प्रत्येकी पाच लाखांची मदत जाहीर झाली असल्याचे पत्र ठाणे जिल्हाधिकाऱ्यांना प्राप्त झाले आहे.

## पहिली ते चौथीचेही वर्ग भरणार

शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांनी आज सर्व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसोबतच्या बैठक घेतली. या बैठकीत वर्षा गायकवाड यांनी राज्यातील सुरू असलेल्या शाळांबाबतचा आढावा घेतला. राज्यात शाळा सुरु होऊन 3 आठवडे झाले आहेत. या तीन आठवड्याचा अनुभव लक्षात घेता राज्यात पहिली ते चौथीच्या शाळा सुरु कराव्यात अशी भूमिका राज्यातील बहुतांश जिल्ह्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी मांडली.

जिल्ह्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर राज्यात सरसकट शाळा सुरु करण्याबाबत वर्षा गायकवाड यांनी लवकरच मंत्रीमंडळ आणि टास्क फोर्सबरोबरही चर्चा करणार असल्याचे सांगितले. मंत्रीमंडळ आणि टास्क फोर्ससोबत चर्चा झाल्यानंतर सरसकट शाळा सुरु करण्याबाबत निर्णय घेणार असल्याची माहिती वर्षा गायकवाड यांनी यावेळी दिली. सध्या राज्यातील ग्रामीण भागात पाचवी ते बारावी आणि शहरी भागात आठवी ते बारावीचे वर्ग सुरु आहेत.

## अखेर 'त्या' फेरीवाल्याविरोधात गुन्हा दाखल

राठोड यांनी दिलेल्या तक्रारीनुसार हुले या फेरीवाल्याविरोधात सुरा उगारून धावणे, जीवे ठार मारण्याची धमकी देणे आणि सरकारी कामात अडथळा आणणे असे कलम लावण्यात आले आहेत. अद्यापही कोणालाही अटक करण्यात आली नसल्याची माहिती पोलिसांनी दिली.

पातलीपाडा येथील स्थानिकांच्या तक्रारीनुसार काशिनाथ राठोड, दिलीप विखणकर, रवींद्र वाघमारे, प्रथमेश सनगरे हे अतिक्रमण विभागाचे कर्मचारी कारवाईला गेले होते. त्यावेळी खोबरे विक्रेता हुले हा फेरीवाला सुरा घेऊन राठोड यांच्या अंगावर धावून गेला. तसेच आधी एकाची बोटे तोडली आता तुझी मान उडवेन असे धमकावले. यावेळी इतर तिघा कर्मचाऱ्यांनी चपळाईने फेरीवाल्याला रोखले. त्यामुळे पुढील दुर्घटना टळली.

या घटनेमुळे काशिनाथ राठोड हा कर्मचारी प्रचंड घाबरला असून त्याचा रक्तदाब वाढला. शुक्रवारी राठोड यांनी कासारवडवली पोलीस ठाण्यात जाऊन झालेल्या प्रकारची तक्रार दिल्यावर त्या फेरीवाल्याविरोधात गुन्हा दाखल झाल्याची पोलीसांनी दिली.

ठाणे शहरातील फेरीवाल्यांचा सर्व्हे देखील करण्यात आला होता. तर सहा हजार 300 फेरीवाल्यांचे अर्ज आले आहेत. आता, या अर्जांच्या छाननी प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली असून लवकरच फेरीवाल्यांना ओळखपत्राचे वाटप केले जाणार असल्याची माहिती महापालिका सूत्रांनी दिली.

कारवाईला जाताना पथकाने समूहाने राहावे, तसेच परिस्थितीचा आढावा घ्यावा, जास्त लोकांची गर्दी जमलेली असल्यास त्या ठिकाणाहून माघार घ्यावी. असा सल्ला दिला आहे तर लवकरच फेरीवाल्यांना ओळखपत्र वाटप केले जाणार आहे, असे अतिक्रमण उपायुक्त अश्विनी वाघमळे यांनी सांगितले.

# वाल्मिकी ऋषींच्या संजीवन समाधीचा शासकीय स्तरावर जीर्णोद्धार करणार - जयेश तरे

**ठाणे :** कोळी समाजाचे नेते स्व. अनंत तरे यांनी रामायणकार महर्षी वाल्मिकी ऋषींच्या संजीवन समाधीस्थळी सुरु केलेला कोळी समाजाचा मेळावा कोरोना आणि स्व. अनंत तरे यांच्या निधनामुळे रद्द केला असला, तरी शासकीय स्तरावर महर्षी वाल्मिकींची जयंती मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी साजरी केली. वाल्मिकी ऋषींच्या समाधी स्थळाचा जीर्णोद्धार व विकास शासकीय स्तरावर करण्यासाठी महाविकास आघाडी सरकारकडे प्रयत्न करणार अशी ग्वाही, महाराष्ट्र कोळी समाज संघाचे अध्यक्ष जयेश अनंत तरे यांनी दिली.



पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील वाल्हे या गावी रामायणकार महादेव कोळी समाजाचे आरध्य दैवत महर्षी वाल्मिकी ऋषींच्या संजीवन समाधी स्थळी स्व. अनंत तरे यांचे काही महिन्यांपूर्वी झालेल्या निधनाच्या पार्श्वभूमीवर जयंती अत्यंत साधेपणाने साजरी करण्यात आली. जयंतीच्या वेळी कीर्तन संपल्यानंतर दुपारी 12 वाजता वाल्मिकीच्या समाधीवर पुष्प अर्पण करण्यात आली. त्यानंतर छोटेखानी झालेल्या कार्यक्रमात महाराष्ट्र कोळी समाज संघाचे अध्यक्ष स्व. अनंत तरे व नुकतेच अखिल भारतीय कोळी समाजाचे महाराष्ट्राचे अध्यक्ष, माजी आ. कांती कोळी यांचे देखील निधन झाले यावेळी दोन्ही कोळी समाजाच्या नेत्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी जयेश तरे म्हणाले की, अनंत तरेंनी वाल्मिकी ऋषींच्या समाधी स्थळाच्या विकासाकरिता प्रश्नांना देखील महाविकासआघाडी सरकारकडून न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करणार आहे. कोळी समाजाने एकसंघ राहून न्याय हक्काची लढाई सुरुच ठेवावी.

कार्यक्रमाला महाराष्ट्र कोळी समाज संघाचे अध्यक्ष जयेश तरे, सचिव मदन भोई, पुणे जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष प्रा. दिगंबर दुर्गाडे, मराठवाडा प्रमुख शिवसेनेचे नगरसेवक सिद्धेश्वर कोळी, संजीव कोळी, गणेश कोळी, विश्वनाथ कोळी, मोहन कडू, एकविरा देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त नवनाथ देशमुख, डी. एम. कोळी, श्यामराव आधटराव, तात्या वांभिरे, खा. सुप्रिया सुळे यांचे खाजगी सचिव मयूर जगताप, दत्ता पाकिरे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र कोळी समाज संघाचे उपाध्यक्ष अरविंद चिव्हे यांनी केले तर पोपटराव भेस्के यांनी आभार मानले.

# १००० गरजू कुटुंबांना मोफत दिवाळी फराळ साहित्य वाटप

**डोंबिवली :** दिवाळीचा सण घराघरात आनंदात साजरा केला जातो.परंतु काही कुटुंब वाढती महागाई व कोरोनामुळे गेलेल्या नोकऱ्या, बंद पडलेले व्यवसाय अशा बिकट परिस्थितीस सामोरे जात आहेत. म्हणून शिवसेना उपजिल्हाप्रमुख सदानंद थरवळ व शिवसेना उपशहरप्रमुख अभिजीत थरवळ यांच्या मार्फत गोग्रासवाडी विभागातील प्रभाग क्रमांक 75-टिळकनगर,83-गोग्रासवाडी,82- अंबिकानगर व 74- पाथर्ली मधील गरजू कुटुंबांना दिवाळीनिमित्त मोफत फराळ साहित्य वाटप करण्यात येणार आहे.

पिवळे व केशरी रेशन कार्ड धारक नागरिकांनाच फराळ साहित्य देण्यात येईल. प्रथम नोंदणी करणाऱ्याला प्राधान्य देण्यात येईल. दि.22 ऑक्टोबर ते 24 ऑक्टोबर 2021 रोजी 6 ते 7.30 दरम्यान शिवसेना शाखा, जिजाई नगर, डोंबिवली पूर्व येथे नाव नोंदणी करावी अशी माहिती शिवसेना उपशहरप्रमुख अभिजीत थरवळ यांनी दिली.

# महिला बचत गटांच्या उत्पादित मालाच्या विक्रीसाठी कडोंमपाची सुविधा

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली मनपा मनपा क्षेत्रातील महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या उत्पादनांना बाजारपेठत विक्रीसाठी स्टॉल तात्पुरते उपलब्ध करणार असल्याने कोरोना सकंटामुळे डबघाईला आलेल्या बचत गटांना उत्पन्नाचा स्त्रोत प्राप्त होणार आहे.





भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधत माहिला बचत गटाच्या रॅलीच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण योजनांबाबत जनजागृती मोहीम मनपाक्षेत्रात सुरु केली आहे. मनपाच्या अंतर्गत दारिद्रय रेषेखालील सुमारे 797 महिला बचतगट, खुले 750 महिला बचतगट असे एकंदरीत 1547 महिला बचत गट नोंदणीकृत असून या महिला बचत गटांतील अनेक महिला बचतगट महिला सक्षमीकरणासाठी मेहनत घेत आपली उत्पादने उत्पादित करून उत्पादित मालांची विक्री करीत समक्षीकरणाकडे वाटचाल सुरू होती. दीड वर्षांपासून कोरोना पार्श्वभूमीवर लॉकडाऊनचा फटका बसल्याने महिला बचत गटांच्या उत्पादनांना विक्रीअभावी घरघर लागली होती. कल्याण-डोंबिवली मनपाने 23 ते 27 ऑक्टोबर या कालावधीत महिला बचत गटांच्या उत्पादित मालाच्या विक्रीसाठी मनपा मुख्यालयालगत सुमारे 20 स्टॉल माफक दरात उपलब्ध होणार असल्याची माहिती समाज कल्याण अधिकारी प्रशांत गवाणकर यांनी दिली.

उप आयुक्त अनंत कदम यांच्याशी संपर्क साधला असता मनपा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली महिला बचत गटांच्या उत्पादित मालाला हक्काची बाजारपेठ मिळण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असल्याचे सांगितले. महिला सक्षमीकरणाकडे वाटचाल होण्यासाठी दिवाळी दरम्यान जागेच्या उपलब्धतेनुसार, मनपाच्या विविध प्रभागक्षेत्र कार्यालया नजीक तात्पुरते स्वरूपाचे स्टॉल उपलब्ध करण्याचा मानस असून आगामी पे ॲन्ड पार्किंगच्या निवादा प्रक्रियेत महिला बचत गटांना प्राधान्य देणार असल्याचे सांगितले.

# वीजदर सवलतीसाठी यंत्रमाग घटकांना अंतिम मुदतवाढ

**ठाणे:** राज्याचे वस्त्रोद्योग धोरणांतर्गत वस्त्रोद्योग घटकांना वीजदर सवलत लागू करण्यात आली आहे. त्यास पात्र असणाऱ्या यंत्रमाग घटकांना आयुक्तालयाच्या https://www.dirtexmah.gov.in संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करण्याची अंतिम मुदत तीन महिन्यांनी वाढवून देण्यात आली आहे.

सुरुवातीला ही मुदत 28 फेब्रुवारी 2021 पर्यंत होती. त्यानंतर 31 मे 2021 पर्यंत त्यास मुदतवाढ दिली परंतु, या मुदतीत देखील बहुतांश यंत्रमाग घटकांनी नोंदणी न केल्याने सर्व प्रकारच्या यंत्रमाग घटकांना तसेच 27 अश्वशक्तीपेक्षा कमी जोडभार असलेल्या यंत्रमाग घटकांना ऑनलाईन किंवा ऑफलाईन यापैकी कोणत्याही प्रकाराने नोंदणी अर्ज सादर करण्याची मुभा देण्यात आली. सदर अर्ज नोंदणी करण्यासाठी 2 सप्टेंबर 2021 च्या पत्रानुसार एक महिन्याची अंतिम मुदत देण्यात आली होती. तरी देखील बहुतांश प्रकल्पांनी नोंदणी केली नाही म्हणून आता पुन्हा नोंदणी करण्यासाठी शेवटची तीन महिन्यांची अंतिम मुदतवाढ देण्यात आली आहे.

यंत्रमाग घटकांनी या मुदतीत आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन किंवा ऑफलाईन (27 अश्वशक्तीखालील घटक) नोंदणी करावी, असे वस्त्रोद्योग आयुक्त शीतल तेली-उगले यांनी कळविले आहे.



**कल्याण-डोंबिवली परिसरात कोविड संसर्गाचा प्रादुर्भाव आटोक्यात आणण्यासाठी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच युवासेनेचे जिल्हाअधिकारी दीपेश म्हात्रे यांच्या आदेशानुसार कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या माध्यमातून कल्याण-डोंबिवली मधील सर्व महाविद्यालयातील विध्यार्थी, शिक्षक व महाविद्यालयातील सर्व कर्मचारी यांच्या आरोग्याच्या सुरेक्षेसाठी कोविड लसीकरणाचे कॅम्प राबविण्यात यावे यासाठी अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांना निवेदन देताना उपजिल्हा युवा अधिकारी आशु सिंहं, उपजिल्हा युवा अधिकारी दुर्गेश चौहान, उपशहर युवा अधिकारी स्वप्नील सुभाष विटकर, उपशहर युवा अधिकारी रोशन पांडे, शाखा प्रमुख परेश म्हात्रे.**



**भारतीय जनता पार्टीच्या शिष्टमंडळाने डोंबिवली एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता आर. पाटील यांची भेट घेतली. डोंबिवली ग्रामीण भागात पाणीटंचाई खूप मोठ्या प्रमाणात आहे, त्यामुळे महिला भगिनी ज्येष्ठ नागरिक आणि सर्वांनाच खूप अडचणींचा सामना करावा लागत आहे. याकरिता त्वरित सुरळीत पाणीपुरवठा व्हावा याकरिता भेट घेतली. यावेळी पाटील यांनीही तातडीने त्या विभागात पाणीपुरवठा सुरळीत करण्यात येईल असे आश्वासन दिले. गोळवली, दावडी, भोपर, आजदे, सागर्ली, सागाव आणि अनेक इतर भागांमध्ये पाण्याची खूप मोठ्या प्रमाणात टंचाई आहे जर पाणी सुरळीत आले नाही प्रेशरने आले नाही तर भारतीय जनता पार्टी मोठ्या प्रमाणात आंदोलन करेल, असे भाजपा शिष्टमंडळाने सांगितले.**

# इंटककडून एसटी अधिकाऱ्यांचा कोरोना योद्धा म्हणून सन्मान

**ठाणे:**महाराष्ट्र एसटी वर्कर्स काँग्रेस इंटकच्या वतीने ठाणे विभागातील एसटी अधिकाऱ्यांचा जिल्हा इंटक अध्यक्ष सचिन शिंदे यांच्या हस्ते कोरोना योद्धा म्हणून सन्मान पत्र देऊन विभागीय कार्यालयात सन्मान करण्यात आला.



कोरोना लॉकडाऊन संपूर्ण राज्यात सुरु असताना ठाणे विभागातील एसटी मात्र सुरु होती. जीवाची पर्वा न करता ठाणे विभागातील एसटी कर्मचाऱ्यांनी कोरोनाच्या आपत्कालीन परिस्थितीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची ने-आण केलेली आहे. विभाग नियंत्रक विनोदकुमार भालेराव यांच्या नेतृत्वाखाली सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या आपत्कालीन परिस्थितीत काम केले. त्यांना एक शाबासकीची थाप म्हणून इंटककडून हा सन्मान करण्यात आला.

या छोटेखानी कार्यक्रमात विभाग नियंत्रक विनोद कुमार भालेराव वाहतुक अधिकारी, रमेश बांदल, अमोल गुप्ते, नितिन आयरे या अधिकाऱ्यांबरोबरच ठाणे जिल्ह्यातील आगार व्यवस्थापक, वाहतुक शाखेतील अधिकाऱ्यांनाही सन्मानित करण्यात आले. यात्रसंगी कार्याध्यक्ष विजय तारमळे, सचिव शामराव भोईर, सहसचिव मनेश सोनकांबळे, खजिनदार सुभाष पवार आदी पदाधिकारी उपस्थित होते.

सचिन शिंदे यांनी कोरोना काळात काम केलेल्या अधिकारी वर्गाचे व कर्मचाऱ्यांचे आपल्या भाषणात कौतुक केले. एसटीचे ठाणे विभाग नियंत्रक विनोद भालेराव यांनी इंटकच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

'ठाणेवैभव' हे दैनिक मालक-मुद्रक-प्रकाशक मिलिन्द बल्लाळ यांनी मिड-डे इन्फोमिडिया लि., R/847/3, टी.टी.सी. इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी रबाळे, नवी मुंबई-४००७०१. महाराष्ट्र येथे छापून दामले अपार्टमेंट, टेंभीनाका, ठाणे (प) महाराष्ट्र -४००६०१ येथे प्रकाशित केले.
दूरध्वनी नं. २५३४१५२६,२५३४८५९४ Email : thanevaibhav1975@gmail.com

# नवी मुंबईतील ३० बेरोजगार तरुणांची फसवणूक



**नवी मुंबई :** दुबई, अबुधाबी येथील कंपनीमध्ये हेल्पर म्हणून कामाला लावण्याच्या बहाण्याने एका भामट्याने केरळ राज्यातील 30 बेरोजगार तरुणांकडून सुमारे 55 लाख रुपये उकळून अस्तित्वात नसलेल्या कंपनीचे ऑफर लेटर देऊन त्यांना अबुधाबी येथे पाठवून फसवणूक केल्याचे उघडकीस आले. महेश शेवती असे या भामट्याचे नाव असून, नेरुळ पोलिसांनी त्याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

आरोपी महेश शेवती याने 2019 मध्ये सीवूड्स सेक्टर 25 मधील सीवूड्स कॉर्नर या इमारतीत आर. एम. मेरिटाइम सर्व्हिसेस प्रा. लि. या नावाने कार्यालय थाटले होते. तसेच परदेशी कामासाठी मुले पाठविण्याचे काम करत असल्याची जाहिरातबाजी केली होती. त्या वेळी कामाच्या शोधात असलेल्या केरळ येथील सहाजुद्दीन हनिफा (36) याने मित्राच्या मदतीने सीवूड्स येथे येऊन आरोपी महेश शेवती याची भेट घेतली होती. त्यानंतर त्यांची विविध प्रकारे फसवणूक करण्यात आलो. अखेर फसवणूक झालेल्या 30 तरुणांनी नेरुळ पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे.

# कोथिंबिरीसह पालेभाज्याही सामान्यांच्या आवाक्याबाहेर

**नवी मुंबई :** मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये भाजीपाल्याची आवक मंगळवारी निम्म्यावर आली. किरकोळ मार्केटमध्ये कोथिंबिर जुडी 80 तर कांदा 60 रुपयांवर पोहचला आहे. पालेभाज्यांचा आकार लहान झाला असून एक जुडीसाठी 25 ते 35 रुपये मोजावे लागत आहेत. मुंबईत प्रतिदिन 650 ते 700 ट्रक, टेंपोमधून भाजीपाल्याची आवक होते. दररोज जवळपास साडेतीन हजार टन भाजीपाला आणि 6 ते 7 लाख जुडी पालेभाज्यांची आवश्यकता असते. परंतु मंगळवारी 595 वाहनांद्वारे केवळ साडेचार लाख जुडी पालेभाज्यांची आवक झाली आहे.



**पालेभाज्यांच्या जुडीचा आकार झाला कमी**

**महागाईमुळे पालेभाज्यांच्या जुडीचा आकार कमी होऊ लागला आहे. घाऊक बाजारातच प्रतिजुडी 15 ते 30 रुपये दर द्यावा लागत आहे. कोथिंबिरीची जुडी घाऊक बाजारात 35 ते 60 रुपयांवर गेली आहे. यामुळे किरकोळ विक्रेते घाऊक बाजारातील जुडीचे दोन किंवा तीन भाग करून त्याची विक्री करत आहेत.**

घाऊक बाजारात कोथिंबिरी जुडी 35 ते 60 रुपये व किरकोळ बाजारात 80 रुपयांनी विकली जात आहे. घाऊक बाजारात मेथी 15 ते 30, पालक 10 ते 30, शेपू 10 ते 18 रुपये जुडी दराने विकला जात आहे. किरकोळ बाजारात या जुडीचे दोन किंवा तीन भाग करून 25 ते 35 रुपये दराने विकल्या जात आहे. कांदा 60 रुपये दराने विकला जात आहे. राज्यात झालेला अवकाळी पाऊस व नंतर सुरु झालेल्या ऑक्टोबर हीट यामुळे आवक कमी होऊन दर वाढू लागले आहेत. पुढील पूर्ण आठवडा मार्केटमधील तेजी कायम राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# नवी मुंबईतील महाविद्यालयांत लसीकरण; दहा ठिकाणी केंद्रांचे नियोजन

**नवी मुंबई :** दीड वर्षांपासून बंद असलेली महाविद्यालये बुधवारपासून सुरु झाली आहेत. मात्र दोन्ही मात्रा घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच प्रवेश दिला जात आहे. त्यामुळे विद्यार्थीसंख्या कमी आहे. यासाठी नवी मुंबई महापालिका प्रशासनाने पुढाकार घेतला असून थेट महाविद्यालयांत लसीकरणाची सुविधा उपलब्ध केली जाणार आहे. शहरातील दहा महाविद्यालयांत शुक्रवारपासून लसीकरण आयोजित करण्यात येणार आहे.

नवी मुंबई करोना लसीकरणात मुंबई महानगर प्राधिकरण क्षेत्रात आघाडीवर आहे. लसपात्र नागरिकांपैकी सर्वांना पहिल्या मात्रेचे लसीकरण पूर्ण झाले असून आता दुसऱ्या मात्रेच्या लसीकरणावर भर दिला आहे. बुधवारपासून शहरांतील महाविद्यालये सुरु करण्यात आली आहेत. मात्र दोन्ही लसमात्रा घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच महाविद्यालयात प्रवेश मिळत आहे. त्यामुळे विद्यार्थीसंख्या कमी असल्याने त्यांचे प्राधान्याने लसीकरण करणे गरजेचे आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने पुढाकार घेतला आहे. पालिका शाळांमध्ये असलेल्या लसीकरण केंद्रावर प्रतिसाद आता कमी मिळत आहे. तेथील केंद्रे बंद करून लसीकरणासाठीचे हे मनुष्यबळ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लसीकरण करण्यासाठी पुरविण्यात येणार आहे.



**31 हजार लसमात्रांचे नियोजन**

**नवी मुंबई महापालिकेला गुरुवारी 30,000 कोव्हिशिल्ड व 1800 कोव्हॅक्सिन लस मिळाली आहे. त्यानुसार पालिका प्रशासनाने लसीकरणाचे नियोजन केले आहे. पालिकेला मोफत लसीकरणासाठी आतापर्यंत 10,00,330 लसमात्रा मिळाल्या आहेत.**

यापूर्वीही महापालिका प्रशासनाने विविध घटकांसाठी विशेष लसीकरण मोहिमा हाती घेतल्या होत्या. त्यानुसार आता महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी लसीकरण मोहीम हाती घेतली आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लसीकरण करण्यासाठी विद्यालयातच जाऊन लसीकरण करण्यात येणार आहे. शक्रवारी 10 महाविद्यालयांत लसीकरण करण्याचे नियोजन असल्याचे पालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी सांगितले.

# डोंबिवलीत ३४ अनधिकृत इमारती अंधारात

**डोंबिवली :** डोंबिवली पश्चिमेत अनधिकृत पद्धतीने उभारण्यात आलेल्या 34 इमारतींना महावितरण कंपनीने विजेचा पुरवठा करू नये असे पत्र महापालिकेने दिले आहे. महापालिकेच्या अतिक्रमण नियंत्रण विभागाचे साहाय्यक आयुक्त सुहास गुप्ते यांनी यासंबंधी महावितरणकडे पत्रव्यवहार केला असून तीन ते सात मजल्यांच्या या इमारती यापुढेही अंधारात राहतील यासाठी प्रयत्न केले जात आहेत. यापुढे शहरातील अनधिकृत इमारतींना विजेचा पुरवठा होऊ नये यासाठी महापालिकेकडून पाठपुरावा केला जात आहे.



'ह' प्रभागातील 34 अनधिकृत बांधकामे उद्यान, बगीचे, शाळा, क्रीडांगण, दवाखाना, महावितरण, दूरसंचार, पोलीस ठाणी अशा सुविधांसाठी आरक्षित भूखंडांवर उभारण्यात आल्या आहेत. मागील दोन वर्षांत ही अनधिकृत बांधकामे माफियांनी उभारली आहेत. या बांधकामांच्या विरोधात रहिवाशांनी अनेक तक्रारी केल्या आहेत. या इमारतींमध्ये सुमारे चार हजार सदनिका आहेत. या इमारती उभारणाऱ्या माफियांवर पालिकेने विष्णुनगर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र नगररचना प्रांतिक कायद्याने कायद्याने गुन्हे दाखल केले आहेत. अनधिकृत इमारतींमुळे पाणी, रस्ते, वीज इतर सुविधांवर येत्या काळात ताण येणार असल्याने, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी अनधिकृत बांधकामांना पाणी, वीजपुरवठा होऊ नये यासाठी दक्ष राहण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. या निर्णयाचा भाग म्हणून महावितरण सोबत पत्र व्यवहार करण्यात आला आहे.

इमारती उभी असलेली ठिकाणे

कोपर, मोठागाव, देवीचापाडा, महाराष्ट्र नगर, आनंदनगर, कुंभारखाण पाडा, नवापाडा, भोईरवाडी, गरिबांचा पाडा, रेतीबंदर भागांत या अनधिकृत इमारती आहेत.


# नवी मुंबईतील महाविद्यालयांत लसीकरण; दहा ठिकाणी केंद्रांचे नियोजन

**नवी मुंबई :** दीड वर्षांपासून बंद असलेली महाविद्यालये बुधवारपासून सुरु झाली आहेत. मात्र दोन्ही मात्रा घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच प्रवेश दिला जात आहे. त्यामुळे विद्यार्थीसंख्या कमी आहे. यासाठी नवी मुंबई महापालिका प्रशासनाने पुढाकार घेतला असून थेट महाविद्यालयांत लसीकरणाची सुविधा उपलब्ध केली जाणार आहे. शहरातील दहा महाविद्यालयांत शुक्रवारपासून लसीकरण आयोजित करण्यात येणार आहे.

नवी मुंबई करोना लसीकरणात मुंबई महानगर प्राधिकरण क्षेत्रात आघाडीवर आहे. लसपात्र नागरिकांपैकी सर्वांना पहिल्या मात्रेचे लसीकरण पूर्ण झाले असून आता दुसऱ्या मात्रेच्या लसीकरणावर भर दिला आहे. बुधवारपासून शहरांतील महाविद्यालये सुरु करण्यात आली आहेत. मात्र दोन्ही लसमात्रा घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच महाविद्यालयात प्रवेश मिळत आहे. त्यामुळे विद्यार्थीसंख्या कमी असल्याने त्यांचे प्राधान्याने लसीकरण करणे गरजेचे आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने पुढाकार घेतला आहे. पालिका शाळांमध्ये असलेल्या लसीकरण केंद्रावर प्रतिसाद आता कमी मिळत आहे. तेथील केंद्रे बंद करून लसीकरणासाठीचे हे मनुष्यबळ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लसीकरण करण्यासाठी पुरविण्यात येणार आहे.





**31 हजार लसमात्रांचे नियोजन**

**नवी मुंबई महापालिकेला गुरुवारी 30,000 कोव्हिशिल्ड व 1800 कोव्हॅक्सिन लस मिळाली आहे. त्यानुसार पालिका प्रशासनाने लसीकरणाचे नियोजन केले आहे. पालिकेला मोफत लसीकरणासाठी आतापर्यंत 10,00,330 लसमात्रा मिळाल्या आहेत.**

यापूर्वीही महापालिका प्रशासनाने विविध घटकांसाठी विशेष लसीकरण मोहिमा हाती घेतल्या होत्या. त्यानुसार आता महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी लसीकरण मोहीम हाती घेतली आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लसीकरण करण्यासाठी विद्यालयातच जाऊन लसीकरण करण्यात येणार आहे. शक्रवारी 10 महाविद्यालयांत लसीकरण करण्याचे नियोजन असल्याचे पालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी सांगितले.


# कल्याण-डोंबिवलीचे रस्ते मजबूत होणार

**डोंबिवली :** कल्याण डोंबिवलीतील रस्त्यांच्या कामासाठी एमएमआरडीएने 360 कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. 31 रस्त्यांची कामे या निधी अंतर्गत करण्यात येणार असून यातील सात रस्त्यांची 28.59 कोटींची कामे महापालिका करणार असून या रस्त्यांच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्याचे काम पालिकेने हाती घेतले आहे. मंजुरीसाठी नंतर ते एमएमआरडीएकडे पाठविण्यात येणार आहे.



येत्या दोन ते तीन महिन्यांत हे रस्ते मार्गी लावण्याचे महापालिकेचे उद्दिष्ट आहे. कामुळे केडीएमसीची आर्थिक व्यवस्था बिकट असल्याने रस्ते विकासासाठी एमएमआरडीएने निधी द्यावा, अशी मागणी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केली होती. कल्याण डोंबिवलीतील रस्त्यांसाठी 360 कोटी, तर एमआयडीसीतील रस्त्यांसाठी 110 कोटी निधी एमएमआरडीएने मंजूर केला आहे. यातून सात रस्त्यांच्या कामाची जबाबदारी पालिकेने घेतली आहे. सातपैकी पाच रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटीकरण करण्यात येणार असून उर्वरित दोन रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटीकरण करावे की डांबरीकरण करावे याची चाचपणी सुरु आहे.

कल्याण डोंबिवली शहरातील रस्त्यांची काम करण्यात येणार आहे. यातील सात रस्त्यांची कामे कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या वतीने करण्यात येणार आहेत. त्याचे अंदाजपत्रक तयार केले जात असून लवकरच ते मंजुरीसाठी एमएमआरडीए कडे पाठविण्यात येईल. मंजुरी मिळताच कामांची निविदा प्रक्रिया काढली जाणार आहे. काम वेगाने पूर्ण केले जाणार आहे.

# 'एमआयडीसी'कडून महापेत रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण

**नवी मुंबई :** एमआयडीसीतील शरपंजरी झालेल्या रस्त्यांचे भाग्य आता उजळणार आहे. गेली 20 वर्षे पालिका व एमआयडीसीतील वादात प्रचंड दुरावस्था झाली होती. आता एमआयडीसीनेही रस्ते उभारणीसाठी पुढाकार घेतला आहे. महापे येथील 'ए ब्लॉक'मधील किमान 15 किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचे सिमेंट क्रॉक्रीटीकरण एमआयडीसी करीत आहे.



एमआयडीसीच्या या पुढाकारामुळे पालिकेच्या तिजोरीतून खर्च होणारे 262 कोटी रुपये वाचणार आहेत. पालिकाही याच क्षेत्रात 15 किलोमीटर लांबींचे रस्ते बांधत असून त्यावर 210 कोटी खर्च करीत आहेत. त्यामुळे येत्या काळात एमआयडीसीतील प्रमुख व काही अंतर्गत रस्ते चकाचक होतील अशी अपेक्षा उद्योजक व्यक्त करीत आहेत. नवी मुंबईतील औद्योगिक वसाहतीमधून पालिका मालमत्ता व पूर्वी उपकर जमा करीत असल्याने पालिकेने या औद्योगिक वसाहतीतील सर्व पायाभूत सुविधांची उभारणी करणे आवश्यक आहे अशी भूमिका येथील लघु व मध्यम उद्योजकांनी घेतल्याने पालिका व उद्योजक असा वाद गेली वीस वर्षे सुरु आहे. नवी मुंबई पालिकेने येथील 136 किलोमीटर लांबीच्या रस्त्यांपैकी 86 किमी लांबीच्या रस्त्यांचे क्रॉक्रीटीकरण केले आहे. दिघा ते महापे आणि महापे ते शिरवणे दरम्यानचे मुख्य रस्त्यांचे क्रॉक्रिटीकरण झाले आहे. या 86 किमी लांबीच्या रस्त्याव्यतिरिक्त एमआयडीसीतील अंतर्गत रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली असून खडयात रस्ता की रस्त्यात खड्डे अशी स्थिती आहे. पावसाळ्यानंतर या रस्त्यांची दुर्दशा या औद्योगिक वसाहतीचे नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर खराब करणारे आहे. उद्योजकांच्या कारखान्यापर्यंत जाणारी कच्च्या मालाच्या वाहनांच्या चालकांना होडी चालवत असल्याचा अनुभव घ्यावा लागत आहे. एमआयडीसीतील अंतर्गत रस्ते दुरुस्त करण्याची निविदा गेली अनेक महिने रखडलेली आहे. सध्या या अंतर्गत रस्त्यांची डागडुजी करण्याचे काम केले जात आहे, पण ते वरवरची असल्याने हे रस्ते पुन्हा खराब होत आहेत. परतीच्या पावसाने तर या रस्त्यांची लक्तरे पुन्हा वेशीवर टांगली आहेत.

नवी मुंबई पालिकेने महापे, शिरवणे, तुर्भे या एमआयडीसी क्षेत्रात कामाला सुरुवात केली असून 15 किमी लांबीच्या 210 कोटी रुपये खर्चाचे कामाचे कार्यादेश दिले आहेत. या कामाला सुरुवात झाली आहे, पण एमआयडीसी निविदा अद्याप कार्यालयीने प्रक्रियेत अडकली आहे. महापे येथील ए ब्लॉकमधील 15 किमी लांबीचे रस्ते एमआयडीसी करणार आहे. त्यासाठी 262 कोटी खर्चाची निविदा काढण्यात आली आहे. एमआयडीसीने हे काम करण्याची तयारी दर्शवल्याने पालिकेची ऐन करोना काळात हा खर्च आहेत. पालिकेचे माजी आयुक्त एम रामास्वामी व विद्यमान आयुक्त अभिजीत बांगर यांनी यासाठी एमआयडीसीकडे स्पष्ट भूमिका मांडली होती. रस्त्यांच्या क्रॉक्रीटीकरणापासून वाचलेल्या 262 कोटी रुपयांचा पालिका इतर प्रकल्पासाठी खर्च करणार आहे

करावरुन वाद नवी मुंबई पालिका आणि टीटीसी औद्योगिक वसाहतीतील लघु व मध्यम आकाराच्या उद्योजकांमधील वाद जुना आहे. एमआयडीसीचा भाग हा नवी मुंबई पालिका क्षेत्रात येत नाही असा दावा येथील उद्योजकांनी केला होता. त्यामुळे पालिकेचे कर हे उद्योजक देणार नाहीत अशी भूमिका येथील लघु उद्योजक संघटनांनी घेतली होती. हा वाद नंतर मुंबई उच्च न्यायालय व नंतर सर्वोच्च न्यायालयात गेला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने या संदर्भात एक निकाल देताना पालिकेला औद्योगिक वसाहतीमधून कर आकारण्याचा अधिकार आहे. त्या बदल्यात पालिकेने या क्षेत्राला पायाभूत सुविधा देणे बंधनकारक असल्याचे म्हटले होते.

# ठाण्यात 80 वर्षांच्या आजीवर यशस्वी शस्त्रक्रिया

**ठाणे :** ठाण्यातील एका खासगी रुग्णालयात एका 80 वर्षांच्या वृद्ध महिलेला गर्भाशयाच्या संबंधी तक्रार असल्याने दाखल करण्यात आले होते. या वेळी डॉक्टरांनी तपासणी केली असता महिलेच्या लघवी वाटेद्वारे गर्भपिशवी बाहेर येत असल्याची गंभीर बाब समोर आली. त्यानंतर डॉक्टरांनी तात्काळ शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला महिलेच्या नातेवाईकांना दिला.

त्यास नातेवाईकांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्यानंतर ही शस्त्रक्रिया पार पडली. सध्या वृद्ध महिलेची प्रकृती स्थिर असल्याचे रुग्णालयाकडून सांगण्यात येत आहे. रक्तस्त्राव आणि प्रचंड वेदनांना 80 वर्षांच्या वृद्ध महिलेला सामोरे जावे लागत होते. या प्रकारामुळे ती महिला घाबरुन गेली होती. चालताना आणि बसताना प्रचंड वेदना सहन कराव्या लागत होत्या. त्या वेळी त्या हॉरायझोन प्राईम रुग्णालयात डॉक्टरांचा सल्ला घेण्यासाठी आल्या होत्या. या वेळी तात्काळ हिस्टरेक्टोमी शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला डॉक्टरांकडून देण्यात आला.

वयाच्या 80 व्या वर्षी शस्त्रक्रिया करणे अतिशय गुंतागुंतीचे होते; मात्र दुसरा पर्याय नसल्याने डॉक्टरांनी नातेवाईकांच्या परवानगीने ही शस्त्रक्रिया यशस्वी केली. साधारणपणे मासिक पाळी असताना ती अनियमितपणे येणे किंवा त्या काळात अतिरक्तस्त्राव होणे तसेच बाळाच्या जन्माच्या वेळी असा धोका होण्याची शक्यता अधिक असल्याचे तज्ज्ञ डॉकरांकडून सांगण्यात येते.

# नवी मुंबई पालिकेचे पहिले चार्जिंग केंद्र १५ दिवसांत; २० केंद्रांचे नियोजन

**नवी मुंबई :** नवी मुंबई महापालिकेने विजेवर चालणाऱ्या वाहनांसाठी शहरात पहिल्या टप्प्यात 20 चार्जिंग केंद्रे उभारण्याची घोषणा केली होती. यातील पहिल्या केंद्राचे काम ज्वेल ऑफ नवी मुंबई येथे सुरु असून ते अंतिम टप्प्यात आहे. पुढील 15 दिवसांत हे केंद्र कार्यान्वित करण्यात येईल असे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी सांगितले.



> **नवी मुंबई शहरात 20 चार्जिंग केंद्रे उभारण्यात येत असून पुढील 15 दिवसांत ज्वेल ऑफ नवी मुंबई येथील चार्जिंग केंद्रांची सुरुवात करण्यात येणार आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या विद्युत वाहनांचा वापर मोठ्या प्रमाणात व्हावा यासाठी पालिका प्रयत्नशील आहे.**
>
> **- अभिजीत बांगर, आयुक्त, महापालिका**

पारंपरिक इंधनावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी केंद्र सरकारने फेम योजनेअंतर्गत विद्युत वाहनांची निर्मिती व वापर वाढावा यासाठी विशेष धोरण आणले आहे. याअंतर्गत 2030 पर्यंत किमान 18 टक्के वाहने ही विजेवर चालणारी असावीत हे धोरण आहे. महाराष्ट्र शासनानेही नुकतेच आपले धोरण जाहीर केले आहे. त्यानुसार सध्या बाजारात दुचाकी, चारचाकी, तीनचाकी व बस ही विजेवर चालणारी वाहने बाजारात येत आहेत. एनएमएमटीच्या 180 विद्युत बस आल्या असून त्यातल्या 50 बस सध्या सेवा देत आहेत. तर दुचाकींमध्ये सध्या अनेक पर्याय आले आहेत. चारचाकीमध्येही पाच ते सहा कार सध्या बाजारात आहेत. मात्र पायाभूत सुविधा नसल्याने अजूनही त्यांना मागणी वाढताना दिसत नाहीत. शहरात चार्जिंग केंद्रे असणे यासाठी गरजचे आहे. त्यानुसार नवी मुंबई महापालिकेने शहरात 20 मोक्याच्या ठिकाणी चार्जिंग केंद्र उभारण्याची घोषणा केली होती. मात्र त्याला गती आली नव्हती. मागील आठवडय़ात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आढावा बैठकीत या विषयाला हात घालत चार्जिंग केंद्रे उभारण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानंतर या कामाला गती आली आहे.

नवी मुंबई महापालिकेने निविदा प्रक्रिया राबवून हे काम पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन यांना दिले असून त्यांनी नेरुळ येथील ज्वेल ऑफ नवी मुंबई येथील काम वेगाने सुरु केले आहे. या ठिकाणी सहा युनिट उभारली जाणार आहेत. यातील दोन युनिटचे काम सध्या अंतिम टप्प्यात आहे. नागरिकांच्या प्रतिसादानुसार त्यात वाढ केली जाणार आहे. पुढील 15 दिवसांत हे केंद्र कार्यान्वित होईल, असा विश्वास पालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी व्यक्त केला आहे. शहरात अशी 20 चार्जिंग केंद्रे उभारण्यात येणार आहेत. सदर कंपनीला केंद्र शासनाकडून 'फेम 2' योजनेतून अनुदानही दिले जाणार आहे. एक वाहन चार्जिंग करण्यास किमान अर्धा ते एक तास इतका कालावधी लागतो. त्यामुळे या वेळात वाहनचालकांची गैरसोय होऊ नये म्हणून प्रत्येक चार्जिंग केंद्रात कॅफेटेरिया, वॉशरुम आदी सुविधा असतील.

**आणखी दहा केंद्रांसाठी निविदा**

पहिल्या टप्प्यात 20 चार्जिंग केंद्रे उभारणार असून यासाठीचे काम सुरु झाले आहे. याव्यतिरिक्त आणखी 10 केंद्रे उभारण्याचे नियोजन असून त्यासाठीची निविदा प्रक्रिया सध्या सुरु आहे. पुढील काळात 30 केंद्रे वाहनचालकांसाठी उपलब्ध होणार आहेत.


**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that my Client **M/S PADMAGRIHA HEIGHTS,** have instructed me to investigate the Title the below mentioned Property described in the Schedule written hereunder belonging to Janardhan Madvi & Others.

Any person having any claim against or to the said property or any part thereof or any right, title or interest or in the FSI of the said property including consumption of additional FSI by way of TDR or otherwise by way of any arrangement, agreement, partnership, joint venture, tenancies, otherwise then those created by the owners, inheritance, succession, exchange, lien, mortgage, encumbrances, lease, charge, trust, easement, possession or otherwise howsoever are hereby required and requested to make the same known in writing with documentary evidence to the undersigned at the address mentioned below within 14 days hereof otherwise such claim or claims, if any will be considered as waived and abandoned.

**SCHEDULE OF THE PROPERTY**

**ALL THAT piece or parcel of land admeasuring 3778.20 sq. mtrs. bearing City Survey No. 1 to 62, Village Balkum, Taluka and District Thane.**

Dated this 23rd day of Oct, 2021

**C.M. Gandhi**
Advocate High Court
1, 3rd floor, Lakhi House,
Above Milton Showroom,
L.B.S. Marg, Bhandup (W),
Mumbai – 400 078.
Email ; advgandhi@ymail.com



**ग्राम पंचायत पवाळे**
कार्यालय : पवाळे, ता. मुरबाड, जिल्हा ठाणे.

**खुल्या निविदा सूचना** जावक क्र./ग्रापं/४४/२०२१

खालील कामाची निविदा नोदणीकृत, बिगर नोंदणीकृत कंत्राट दारांकडून मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा नमुना ८ मध्ये नमुद तारखेला दुपारी ३.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास त्याच दिवशी उघडण्यात येतील. कोऱ्या निविदा ग्रामपंचायत कार्यालय पवाळे येथे उपलब्ध आहे. मुदतीनंतर येणाऱ्या निविदा स्विकारण्यात येणार नाहीत. अटी युक्त निविदा बाबात कोणताही खुलासा करण्यात येणार नाहीत.

ग्रामपंचायत निधी १५ वित्त आयोग अंतर्गत काम

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्र किंवा रक्कम | इसारा रक्कम | कोऱ्या निविदा रक्कम | सुरक्षा अनामत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गौतम पवार ते दिपक पवार यांचे घरापर्यंत पेव्हर ब्लॉक बसविणे | १२३८९३/- | १२३९/- | १००% | ५% |
| २ | वज्रेचा वाडी समाज गृहासमोरील रस्ता पेव्हर ब्लॉक करणे | १०५८३९/- | १०५८/- | १००% | ५% |
| ३ | बबन गिरा ते महादू गिरा घरापर्यंत पेव्हर ब्लॉक बसवणे | १४४८६४/- | १४४८/- | १००% | ५% |
| ४ | दिलीप पवार ते गणपत पवार घरापर्यंत पेव्हर ब्लॉक रस्ता करणे | १०५८६७/- | १०५८/- | १००% | ५% |
| ५ | योगेश पवार घरासमोर पेव्हर ब्लॉक बसविणे | १०५८४४/- | १०५८/- | १००% | ५% |
| ६ | शिवाजी बाळु पवार यांचे घरा समोरील रस्ता पेव्हर ब्लॉक करणे | ४९९२१/- | ४९९/- | १००% | ५% |

०७) कोऱ्या निविदा मिळविण्याचा दिनांक :२५-१०-२०२१ ते २७-१०-२०२१
०८) निविदा स्विाकरण्याचा दिनांक : २९-१०-२०२१
०९) कंत्राटदाराचा वर्ग : निरंक
१०) मंजूर निविदा धारकाने कामाचा करार नामा त्वरीत पूर्ण करायचा आहे.
११) कंत्राटदारास काम करण्यास कोणतेही अग्रीम मिळणार नाही
१२) मुल्यांकना नुसार रक्कम अदा केली जाईल
१३) कामाच्या दर्जाबाबत प्रश्न निर्माण झाल्यास सर्व जबाबदारी कंत्राटदाराची राहील कामाचा व मजुरांचा विमा उतरवण्याची सर्व जबाबदारी कंत्राटदाराची राहील
१४) काम पूर्ण करावयाची मुदत : २ (दोन) महिने
१५) निविदा सक्षम सादर कराव्यात
१६) कार्यालयीन वेळेस कामाचे अंदाजपत्रक पहावयास मिळेल.

सहि/-
ग्रामसेवक
ग्राम पंचायत पवाळे ता. मुरबाड, जि. ठाणे.

सहि/-
सरपंच
ग्राम पंचायत पवाळे ता. मुरबाड, जि. ठाणे.

# “जोपर्यंत युद्ध चालू आहे, शस्त्र खाली ठेवू नका”; सणांपूर्वी पंतप्रधानांनी देशाला केले सावध



**नवी दिल्ली : कोरोना विषाणूविरुद्धच्या युद्धात भारताने केवळ नऊ महिन्यांत 100 कोटींहून अधिक लसीकरण करून एक नवीन विक्रम प्रस्थापित केला आहे. लसीकरणाबाबतच्या या कामगिरी दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी आज देशाला संबोधित केले. पंतप्रधान मोदी सकाळी 10 वाजता राष्ट्राला संबोधित केले. यावेळी 100 कोटी लसीचे डोस हे केवळ आकडे नाहीत. हे देशाच्या सामर्थ्याचे प्रतिबिंब आहे. इतिहासाचा नवा अध्याय तयार होत आहे असे पंतप्रधान म्हणाले.**

### जोपर्यंत युद्ध चालू आहे, शस्त्र खाली ठेवू नका

करोनाविरोधातील युद्धात, पंतप्रधान मोदींनी देशवासियांना कोणतेही शिथिलता न आणण्याचे आवाहन केले. “कितीही चांगले चिलखत, कितीही आधुनिक चिलखत असले तरी, चिलखतीपासून संरक्षणाची संपूर्ण हमी आहे तरी युद्ध चालू असतानाही शस्त्रे फेकली जात नाहीत. मी विनंती करतो की आपण आपले सण अत्यंत काळजीपूर्वक साजरे केले पाहिजेत. देशाला मोठी ध्येये कशी ठरवायची आणि ती कशी साध्य करायची हे माहित आहे. पण, यासाठी आपण सतत सावधगिरी बाळगली पाहिजे. आपण निष्काळजी राहू नये,” असे पंतप्रधानांनी म्हटले आहे.

“कृतं मे दक्षिणे हस्ते जयो मे सव्य आहितः या गोष्टीला भारताच्या संदर्भात पाहिले तर साधा अर्थ असा की आपल्या देशाने एका बाजूला कर्तव्याचे पालन केले तर दुसरीकडे मोठे यश देखील मिळाले. काल 21 ऑक्टोबर रोजी 100 कोटींच्या लसींच्या डोसचे कठिण पण विलक्षण लक्ष प्राप्त केले आहे. यामागे देशातील 130 कोटी नागरिकांची शक्ती आहे. यामुळे हे यश भारताचे आहे. मी यासाठी सगळ्यांचे अभिनंदन करतो,” असे पंतप्रधान मोदी यांनी म्हटले आहे. “100 कोटी लसीचे डोस हे केवळ आकडे नाहीत. हे देशाच्या सामर्थ्याचे प्रतिबिंब आहे. इतिहासाचा नवा अध्याय तयार होत आहे. हे एक नवीन भारताचे चित्र आहे, जे कठीण ध्येय निश्चित करण्यासाठी आणि ते साध्य करण्यासाठी ओळखले जाते. हे भारताचे चित्र आहे जे त्याच्या कर्तृत्वासाठी कठोर परिश्रम करते. आज अनेक लोक भारताच्या लसीकरणाची तुलना जगातील इतर देशांशी करत आहेत. ज्या वेगाने भारताने 100 कोटींचा टप्पा ओलांडला आहे त्याचेही कौतुक केले जात आहे. पण या विश्लेषणात एक गोष्ट वगळली आहे, की आपण हे कुठे सुरु केले. ते जगातील इतर देशांसाठी लस शोधण्यात, संशोधन करण्यात मास्टर होते. भारत या देशांकडून बनवलेल्या लसीवरच अवलंबून होता. जेव्हा ही महामारी आली, तेव्हा भारतावर प्रश्न निर्माण होऊ लागले की भारत त्याच्याशी लढा देऊ शकेल का, दुसऱ्या देशातून लस आणण्यासाठी पैसे कुठून येतील, भारताला लस मिळेल की नाही, भारत लसीकरण करू शकेल का? बरेच लोक, अनेक प्रश्न होते, पण आज हा 100 कोटी डोस प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देत आहे. भारताने आपल्या नागरिकांना 100 कोटी लसीचे डोस दिले आहेत आणि तेही मोफत,” असे पंतप्रधांनी म्हटले आहे.

“व्हीआयपी संस्कृती लसीकरण संस्कृतीवर वर्चस्व गाजवू नये याची खात्री करण्यात आली. प्रत्येकाला सामान्य माणसाप्रमाणे लसीकरण झाले. जगातील अनेक देशांमध्ये लसीचा संकोच ही एक मोठी समस्या बनली आहे. त्याच वेळी, 100 कोटी लसीचे डोस देऊन, भारताने त्या लोकांना उत्तर दिले जे प्रश्न उपस्थित करत होते की भारतातील लसीबद्दलचा संकोच कसा दूर होईल,” असे मोदी म्हणाले.

# अखेर सैन्यातील ३९ महिला अधिकाऱ्यांना हक्क मिळाला

**.नवी दिल्ली : भारतीय सैन्यातील महिला अधिकाऱ्यांच्या न्यायलयीन लढाईला मोठं यश आलंय. सर्वोच्च न्यायालयाने 39 महिला अधिकाऱ्यांना कायम सेवेत समाविष्ट करण्याचा ऐतिहासिक निर्णय दिला. यानंतर या 39 महिला अधिकाऱ्यांना भारतीय सैन्यात समाविष्ट करण्यात आलंय. न्यायालयानं 7 दिवसात त्यांना कायम सेवेचा दर्जा देण्यास सांगितलं होतं. त्यांना आता कायम सेवेत समाविष्ट करून तो दर्जा देण्यात आलाय.**

भारतीय सैन्यात महिलांना सध्या अल्प काळासाठीच सेवेत दाखल करुन घेण्यात येत होतं. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने महिलांना देखील भारतीय सैन्यात कायम सेवेत समाविष्ट करून घेण्याचा निर्णय दिला. त्यामुळे महिला अधिकाऱ्यांना कायम सेवेनुसार निवृत्त होईपर्यंत काम करता येणार आहे. शॉर्ट सर्विस कमिशनमध्ये महिलांना केवळ 10 वर्षांसाठी सेवेत राहता येतं. त्यानंतर त्यांना काम सोडण्याचा किंवा कायम सेवेत दाखल होण्याचा पर्याय होता. ज्यांना कायम सेवेत घेतलं नाही त्यांना फारतर 4 वर्षांसाठी मुदतवाढ मिळत होती. भारतीय सैन्यानं 71 महिला अधिकाऱ्यांना कायम सेवेत रुजू करुन घेण्यास नकार दिला होता. यानंतर या महिला अधिकारी सर्वोच्च न्यायालयात गेल्या. केंद्र सरकारनं या प्रकरणात न्यायालयाला सांगितलं, की 71 पैकी 39 महिला अधिकारी पात्र ठरल्यात. 7 वैद्यकीयदृष्ट्या सक्षम नाही आणि 25 महिलांचा शिस्त पाळण्यात अडचण आहे. यावर न्यायालयाने 39 महिला अधिकाऱ्यांना कायम सेवेत समाविष्ट करण्याचा आणि इतर 25 महिला अधिकाऱ्यांबाबत सविस्तर अहवाल देण्याचे निर्देश सरकारला दिलेत. तसेच त्यात या 25 महिला अधिकारी पात्र का नाहीत याचं सविस्तर उत्तर देण्याचे निर्देश दिलेत.

1 ऑक्टोबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने 71 महिला अधिकाऱ्यांना सेवेतून काढून न टाकण्याचे निर्देश दिले होते. न्यायमूर्ती डी. वाय. चंद्रचूड आणि न्यायमूर्ती बी. व्ही. नागारत्न यांच्या 2 सदस्यीय खंडपीठासमोर या प्रकरणी सुनावणी झाली.



# दिवाळीपर्यंत कांद्याचे दर ‘तेजीतच’

मुंबई : कांद्याचेच नव्हे तर इतर सर्व भाजीपाल्याचेही दर हे वाढलेले आहेत. ठोक बाजारात हे दर नियंत्रणात असले तरी मात्र, किरकोळ बाजारात गगणाला भिडलेले आहेत. हवामानाचा परिणाम आणि मध्यंतरी पावसाचा मारा यामुळे भाजीपाल्याचे प्रचंड असे नुकसान झाले होते. त्यामुळेच आता दर वाढलेले आहेत. सध्या सणासुदीचे दिवस आहेत त्यामुळे दिवाळीपर्यंत तरी हेच दर कायम राहतील किंवा यामध्ये वाढ होणार असल्याचा अंदाद व्यक्त होत आहे. कांदा हे नगदी पीक असून कधी शेतकऱ्याच्या तर कधी ग्राहकांच्या डोळ्यात पाणी आणतो. यावेळी मात्र, मागणी अधिक आणि पुरवठा कमी होत असल्याने कांद्याच्या दरात वाढ होत आहे. किरकोळ बाजारात कांदा 60 ते 70 रुपये किलोने विकला जात आहे.

## Public Notice

**In the court of 3rd Jt. C.J. (S.D.) Thane : At Thane Honorable Judge, Shri S.K. Fokemare Saheb,**

**Civil Misc. Application No-1068/2021** **Exhibit No-**

Mr. Pyarelal Ramdas Prajapati, Hindu, Age about 37 Years, R/a- H.N.No. 1327, Bhimnagar, Near Durga Mandir, Rable, S.O.Ghansoli, Ghansoli, Navi Mumbai-400708, (17/11/21) **..... Applicant**

**V/s**

1) Mr. Sitapati @ Sita Ramdas Prajapati, Hindu, Age about 60 Years, 2) Mr; Jawahirlal Ramdas Prajapati, Hindu, Age about -32 Years., 3) Mr. Jiyalal Ramdas Prajapati, Hindu, Age about 30 Years, All r/a-H.N.No. 1327, Bhimnagar, Near Durga Mandir, Rabale, S.O. Ghansoli, Navi Mumbai-400708,.... Respondents

WHEREAS the abovenamed applicant is the son of the respondent no-1 and real brother of the respondent no-2 and 3. The real father of the applicant namely Late Shri. Ramdas @ Ram Daras Nohar Prajapati, who expired on 28/04/2021, at Azamgarh, U.P.

WHEREAS the applicant abovenamed has filed the present application for grant of the Heirship Certificate, in respect of the said property more particularly described in the schedule hereunder, left by the deceased's mother of the applicant namely Late Shri, Ramdas @ Ram Daras Nohar Prajapati.

AND WHEREAS if any person is/are having any right, title, interest and/or benefit etc., in the schedule of said room and is/are hereby invited to submit his/her/their objection in this court on 17/11/2021 and/or within the period of 30 days from the date of the publication of this public notice.

Schedule of the Property

A room bearing no-1327, area admeasuring about 10 x 15 Sq.Ft., vide Property No-GHA-RAB-1327, Ward GHANSOLI, Near Durga Mandir, Rabale, S.O. Ghansoli, Navi-Mumbai, within the limits of Navi-Mumbai-Municipal Corporation.

Total Value of the said property is of Rs. 5,50,000/-

As such if nothing is received within the stipulated period of 30 days from the date of publication of this public notice, the application of the applicant shall be allowed and the Heirship Certificate as prayed for shall be granted.

Given under my hand and the seal of the court on 21 Day of 10 2021

**Sd/- Clerk** — Seal — **By order Superintendent (Judicial Branch) Civil Court, (S.D.), Thane**

## जाहीर नोटीस

**ठाणे येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या न्यायालयात, ठाणे**

चौकशी अर्ज क्र. १७६७/२०२१

**श्री. कुंदन कृष्णा भोईर** ..... **अर्जदार**

**वि.**

उप निबंधक, ठाणे महानगरपालिका, ठाणे ...... **सामनेवाले**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. कुंदन कृष्णा भोईर यांचा भाऊ नामे **कै. किशोर कृष्णा भोईर** यांचा मृत्यू ०९/०५/२००३ रोजी राहत्या घरी झालेले असून सदरच्या मृत्यूचा नोंदणी आदेश मिळणेकामी त्यांनी ठाणे येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी दुसरे कोर्ट यांच्या न्यायालयात किरकोळ चौकशी अर्ज क्र. १७६७/२०२१ दाखल केलेला आहे.

सदर अर्जास कोणाचीही काहीही हरकत असल्यास त्यांनी स्वतः किंवा वकिलांमार्फत हे नोटीस जाहीर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत तोंडी किंवा लेखी हरकत नोंदवावी. नमूद कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अर्जदार **श्री. कुंदन कृष्णा भोईर** यांना त्यांचा भाऊ नामे **कै. किशोर कृष्णा भोईर** यांचा मृत्यू दाखला नोंदणी आदेश अर्जदारास मिळण्यास कोणाचीही काहीही हरकत नाही, असे समजून त्यांना मृत्यू दाखला किंवा मृत्यू नोंदणी आदेश अर्जदाराच्या हितात देण्यात येईल व तद्नंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

**सही/– लिपिक** — शिक्का — **हुकूमावरून सही/– सहाय्यक अधिक्षक**

## जाहिर नोटीस

**सर्व संबंधितांना या जहिर नोटीसीने कळविण्यात येते की, जमीनमालक श्री. करन सोहनलाल जैन, रा. वायलेनगर, खडकपाडा, कल्याण (प.), सर्वे नं. जुना २१, नविन १०२/१हि. नं. १, क्षेत्र ९.१० स्के. मी. ही मिळकत कल्याण डोंबिवली महापालिकेच्या १५.०० मी रुंद महापालिकेतील गोरगरीबांना घरे बांधण्याकरीता दिले गेले आहे. त्याबदल्या टिडीआर घेतला आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क, अधिकार, व अन्य हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत खाली दिलेल्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह सादर करावे. तक्रार व दावा न अल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे गृहित धरुन माझे अशिल सदरची मिळकत महापालिकेच्या नावाने हस्तांतरीत करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

**पत्ता : वायलेनगर, खडकपाडा, कल्याण (प.)**
**मो. नं. ७३०४७०४८७१**

**सही/- करन सोहनलाल जैन**

## जाहीर इशारा नोटीस

तमाम लोकांस या जाहीर इशारा नोटीसीने कळविण्यात येते की,

**१. मिळकतीचे वर्णनः (अ)** तुकडी जिल्हा ठाणे, पोट तुकडी तालुका **शहापुर** पैकी **मौजे विहीगाव** या गावचे शिवारातील शेतजमिन मिळकत यासी **गट नंबर १५२** यासी एकुण क्षेत्र ०० हे.२० आर पैकी **श्री.मनोहर भिमराव पसारे** यांचे **मालकीचे अविभक्त क्षेत्र ०० हे.१० आर** यासी आकार रूपये ००=१२ पैसे यासी चतुःसिमा रेकॉर्ड ऑफ राईटस प्रमाणे. **(ब)** तुकडी जिल्हा ठाणे, पोट तुकडी तालुका **शहापुर** पैकी **मौजे विहीगाव** या गावचे शिवारातील शेतजमिन मिळकत यासी **गट नंबर २१९** यासी एकुण क्षेत्र १८ हे.८.८ आर पैकी **श्री.मनोहर भिमराव पसारे** यांचे **मालकीचे अविभक्त क्षेत्र ०९ हे.४.४ आर** यासी आकार रूपये १७=५० पैसे यासी चतुःसिमा रेकॉर्ड ऑफ राईटसप्रमाणे.

**(क)** तुकडी जिल्हा ठाणे, पोट तुकडी तालुका **शहापुर** पैकी **मौजे विहीगाव** या गावचे शिवारातील शेतजमिन मिळकत यासी **गट नंबर ४२९** यासी एकुण क्षेत्र ०२ हे.७९ आर पैकी **श्री.मनोहर भिमराव पसारे** यांचे **मालकीचे अविभक्त क्षेत्र ०१ हे.३९.५ आर** यासी आकार रूपये ०२=०० पैसे यासी चतुःसिमा रेकॉर्ड ऑफ राईटसप्रमाणे. **(ड)** तुकडी जिल्हा ठाणे, पोट तुकडी तालुका **शहापुर** पैकी **मौजे विहीगाव** या गावचे शिवारातील शेतजमिन मिळकत यासी **गट नंबर ४३१** यासी एकुण क्षेत्र ०४ हे.९९.७ आर पैकी **श्री.मनोहर भिमराव पसारे** यांचे **मालकीचे अविभक्त क्षेत्र ०२ हे.४९.८५ आर** यासी आकार रूपये ०९=४६ पैसे यासी चतुःसिमा रेकॉर्ड ऑफ राईटसप्रमाणे.

२. वर वर्णन केलेल्या सर्व मिळकती मध्ये **श्री.मनोहर भिमराव पसारे** यांचा अविभक्त असा हिस्सा आहे व त्यांचे नाव सदर मिळकतीच्या रेकॉर्ड ऑफ राईटसला लागलेले होते. त्यांनी त्यांचा असलेला अविभक्त हिस्याचे रजिस्टर साठेखत श्री.ललित मोहनलाल साखला यांचे लाभात लिहुन व नोंदवुन दिलेले आहे. श्री.ललित मोहनलाल साखला यांनी श्री.मनोहर भिमराव पसारे यांना ठरलेल्या रक्कमे एवढी संपुर्ण रक्कम दिलेली आहे. श्री.मनोहर भिमराव पसारे हे दिनांक २९/०६/२०१६ रोजी मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्युपश्चात त्यांचे वारसांनी श्री.ललित मोहनलाल साखला यांचे लाभात साठेखतातील अटी व शर्तीचे पालन करून खरेदीखत करून देण्यासाठी नकार दिल्याने श्री.ललित मोहनलाल साखला यांनी (१) श्रीमती मोनिका मनोहर पसारे (२) श्रीमती राधिका नितीन पोटे यांचे विरूद्ध कल्याण येथील दिवाणी कोर्टात स्पेशल मुकादमा नंबर २२६/२०२० हा खरेदीखत करून मिळणेसाठी व निरंतरचे ताकिदीसाठी दाखल केलेला आहे व सदर दाव्यात (१) श्रीमती मोनिका मनोहर पसारे (२) श्रीमती राधिका नितीन पोटे हे वकीला मार्फत हजर झालेले आहेत.

**३.** सबब या जाहीर इशारा नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की,

वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकती संबंधाने कोणीही वर नमुद व्यक्तीबरोबर कोणत्याही स्वरूपाचा व्यवहार करू नये, केल्यास त्याच्या खर्चांची व परिणामांची जबाबदारी ही आमचे पक्षकारांवर राहणार नाही, केवळ जनतेला सत्य परिस्थिती समजावी म्हणुन सदरची जाहीर इशारा नोटीस प्रसिद्ध करीत आहे. कळावे.

**नासिक, दिनांकः २०.१०.२०२१**

सही/- **श्री.शरद हरिभाऊ दिवाकर, ॲडव्होकेट**

अलीशान बंगला, शिवनगर, तलाठी कॉलनी शेजारी, दिंडोरीरोड, नाशिक.

## जाहीर नोटीस

**ठाणे येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या न्यायालयात, ठाणे**

चौकशी अर्ज क्र. १७६५/२०२१

**श्री. कुंदन कृष्णा भोईर** ..... **अर्जदार**

**वि.**

उप निबंधक, ठाणे महानगरपालिका, ठाणे ...... **सामनेवाले**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, आमचे अशिल **श्री. कुंदन कृष्णा भोईर** यांचे वडील **कै. कृष्णा हेन्द्या भोईर** यांचा मृत्यू १४/०५/१९६९ रोजी राहत्या घरी झालेले असून सदरच्या मृत्यूचा नोंदणी आदेश मिळणेकामी त्यांनी ठाणे येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी दुसरे कोर्ट यांच्या न्यायालयात किरकोळ चौकशी अर्ज क्र. १७६५/२०२१ दाखल केलेला आहे.

सदर अर्जास कोणाचीही काहीही हरकत असल्यास त्यांनी स्वतः किंवा वकिलांमार्फत हे नोटीस जाहीर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत तोंडी किंवा लेखी हरकत नोंदवावी. नमूद कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अर्जदार **श्री. कुंदन कृष्णा भोईर** यांना त्यांच्या वडिलांचा मृत्यू दाखला नोंदणी आदेश अर्जदारास मिळण्यास कोणाचीही काहीही हरकत नाही, असे समजून त्यांना मृत्यू दाखला किंवा मृत्यू नोंदणी आदेश अर्जदाराच्या हातात देण्यात येईल व तद्नंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

**सही/– लिपिक** — शिक्का — **हुकूमावरून सही/– सहाय्यक अधिक्षक**

## जाहीर नोटीस

**ठाणे येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या न्यायालयात, ठाणे**

चौकशी अर्ज क्र. १७६६/२०२१

**श्री. कुंदन कृष्णा भोईर** ..... **अर्जदार**

**वि.**

उप निबंधक, ठाणे महानगरपालिका, ठाणे ...... **सामनेवाले**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, आमचे अशिल **श्री. कुंदन कृष्णा भोईर** यांचे आजोबा **कै. हेन्द्या उंदऱ्या भोईर** यांचा मृत्यू २४/०३/१९६४ रोजी राहत्या घरी झालेले असून सदरच्या मृत्यूचा नोंदणी आदेश मिळणेकामी त्यांनी ठाणे येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी दुसरे कोर्ट यांच्या न्यायालयात किरकोळ चौकशी अर्ज क्र. १७६६/२०२१ दाखल केलेला आहे.

सदर अर्जास कोणाचीही काहीही हरकत असल्यास त्यांनी स्वतः किंवा वकिलांमार्फत हे नोटीस जाहीर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत तोंडी किंवा लेखी हरकत नोंदवावी. नमूद कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अर्जदार **श्री. कुंदन कृष्णा भोईर** यांना त्यांच्या आजोबा नामे **कै. हेन्द्या उंदऱ्या भोईर** यांचा मृत्यू दाखला नोंदणी आदेश अर्जदारास मिळण्यास कोणाचीही काहीही हरकत नाही, असे समजून त्यांना मृत्यू दाखला किंवा मृत्यू नोंदणी आदेश अर्जदाराच्या हातात देण्यात येईल व तद्नंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

**सही/– लिपिक** — शिक्का — **हुकूमावरून सही/– सहाय्यक अधिक्षक**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात दर्शविलेली जमीन मिळकत ही प्रत्यक्ष कब्जा वहिवाटीची व कागदोपत्री ७/१२ सदरी रघुनाथ बामा खंडागळे, कमलाबाई विष्णु पाटील, कैलास शांताराम खुटारकर व इतर खातेदार यांचे नावे नोंद असलेली जमिन मिळकत असून ही जमिन मिळकत माझे पक्षकार– आशिक अली मुस्तफा हुसैन शेख राहणार– बैतुन नुर कॉम्पलेक्स, बी–१/४०३, खडी मशीन रोड, झम झम हॉल जवळ, मुंब्रा, ता. जि. ठाणे ४००६१२, यांनी कायम स्वरूपी कराराने विकत घेतलेली असून बयाणा रक्कम अदा केलेली आहे.

तरी सदरहु मिळकतीवर कोणाचेही काही एक हक्क, अधिकार, करार मदार, कुळवहिवाट, कब्जा, वारस अथवा अन्य हक्क व हितसंबंध असलेल्या व्यक्ति वा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात खालील सही करणार यांच्या पत्त्यावर १५ दिवसांच्या आत कळवावी. वरील मुदतीत कोणाकडून काहीएक हरकत वा तक्रार न आल्यास सदरहु मिळकत ही बोजाविरहित आहे. असे समजून आम्ही वरील मालकासोबत पुढील करार, मदार, व्यवहार पूर्ण करू व त्यानंतर येणाऱ्या हरकती कोणत्याही प्रकारे विचारात घेतल्या जाणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : डावले, तलाठी सजा शिळ, ता. जि. ठाणे**

| भूमापन क्र. | भूमा.क्र.चा उपविभाग | क्षेत्र हे.आर.प्र. | पो.खराबा हे.आर.प्र. | क्षेत्र हे.आर.प्रती |
| --- | --- | --- | --- | --- |
| ८० | १ | ०–०८–१० | ०–०७–३० | लागवडी क्षेत्र ०–६२–१० आर.प्रती पो. खराबा क्षेत्र ०–०७–३० आर.प्रती यातून लागवडी क्षेत्रातील विक्री करण्यात आलेले क्षेत्र ०–५६–०० आर.प्रती म्हणजेच ५६ गुंठे |

पत्ता –
आर.एस.पांडे
डि.एन.एस.टॉवर, तळमजला,
कोर्टनाका, ठाणे – पश्चिम

शिक्का

**सही/– आर.एस.पांडे**

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीव्दारे सूचित करण्यात येते की आमचे पक्षकार, श्री. ताराचंद उर्फ टारझन उंदऱ्या पाटील व श्री. रमेश उंदऱ्या पाटील रा. घोडबंदर रोड, ता. व जि. ठाणे आणि इतर यांनी **श्री. सुरेश शालिक म्हात्रे (मालक– मे. एस.एस.एम. बिल्डर्स ॲंड डेव्हलपर्स)** यांचेविरूध्द परिशिष्ठात नमुद केलेल्या मिळकतीबाबत व त्यावर **‘पेरीविंक्ल कॉम्पलेक्स’** नावाने बांधकाम झालेल्या व प्रस्तावित इमारतींमधील सदनिका, दुकाने, इ. बाबत ठाणे येथील मा. दिवाणी न्यायालयात **रेग्युलर दिवाणी मुकदमा क्र. ११ / २०१४** दाखल केला असून नमुद दाव्यामध्ये मा. न्यायालयाने श्री. सुरेश शालिक म्हात्रे (मालक – मे. एस.एस.एम. बिल्डर्स ॲंड डेव्हलपर्स) यांचेविरूध्द **दि. ११.०३.२०१५ रोजी मनाई हुकूमाचे आदेश जाहीर** करून परिशिष्ठात नमुद केलेल्या मिळकतीवर बांधकाम झालेल्या व प्रस्तावित इमारतीमधील सदनिका, इ. विक्रयास प्रतिबंध केले आहे. ठाणे येथील मा. जिल्हा न्यायालयाने नमुद दि. ०७.०९.२०१६ रोजी किरकोळ दिवाणी अपिल क्र. ७८/२०१५ मध्ये वर नमुद केलेले दि.११.०३.२०१५ रोजीचे मनाई हुकूमाचे आदेश कायम ठेवले आहेत.

मा. न्यायालयाचे सदर मनाई हुकूम अस्तित्वात असताना देखील श्री. सुरेश शालिक म्हात्रे (मालक – मे. एस.एस.एम. बिल्डर्स ॲंड डेव्हलपर्स ) यांनी परिशिष्ठात नमुद केलेल्या मिळकतीवरील ‘पेरीविंक्ल कॉम्पलेक्स’ च्या इमारतींमधील काही सदनिकेंबाबत मा. न्यायालयाचे मनाई हुकूम डावलून व्यवहार केल्यामुळे आमचे पक्षकार व इतर यांनी श्री. सुरेश शालिक म्हात्रे (मालक – मे. एस.एस.एम. बिल्डर्स ॲंड डेव्हलपर्स) व सर्व संबंधितांवर **रे. मु. क्र. ७१७/२०१७, ७१८/२०१७, ७८७/२०१७, ७८८/२०१७, ७८९/२०१७, ७९०/२०१७, ६/१८, ७/१८, ८/१८, ९/१८, १०/१८, ११/१८, १२/१८, १३/१८ व १४/१८** दाखल केले असून नमुद दाव्यांमध्ये देखील मा. न्यायालयाने सदनिकेंच्या हस्तांतरणाबाबत मनाई हुकूमाचे आदेश जाहिर केले आहेत.

तरी परिशिष्ठात नमुद केलेल्या मिळकतीवरील ‘**पेरीविंक्ल कॉम्पलेक्स**’ या नावाने बांधलेल्या व प्रस्तावित इमारतींमधील कोणत्याही सदनिकेंबाबत व दुकाने, गाळे, इ. बाबत श्री. सुरेश शालिक म्हात्रे (मालक – मे. एस.एस.एम. बिल्डर्स ॲंड डेव्हलपर्स) यांचेशी कुठल्याही प्रकारचे करार, मदार, दान, गहाण, बक्षीस, व्यवहार, इ. करू नये आणि केल्यास त्यास मा. न्यायालयाचा अवमान समजला जाईल आणि अश्या प्रकारचे कुठलेही व्यवहार आमच्या पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाहीतच पण आमच्या पक्षकारांना सर्व संबंधित इसमांवर दिवाणी व फौजदारी स्वरूपाची गंभीर व सक्त कायदेशीर कार्यवाही करण्यास भाग पडेल, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

**मिळक्तीचे परिशिष्ठ**

गाव वडवली, तलाठी सजा ओवळे, तालुका व जिल्हा ठाणे आणि ठाणे महानगरपालिकेच्या हददीतील खालील वर्णनाची जमिन

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. |
| --- | --- |
| ७२ | २ |
| ७३ | १ |
| ७५ | २ |

**श्री.जयदीप एम. पाटकर**
**वकील**
तिसरा मजला, फेनकिन कॅपीटल बिल्डींग,
राम मारूती रोड, नौपाडा, ठाणे (प) ४००६०२

## PUBLIC NOTICE

**TAKE NOTICE THAT** Thane Shivam Co-operative Housing Society Ltd, registered under the Maharashtra Co-operative Society Act, bearing registration No.TNA/HSG/1565/1983 having office at Panchpakhadi, Thane (W) – 400 602 has represented that it is the owner of and absolutely seized and possessed of and or well and sufficiently entitled to all that piece and parcel of plot of land together with building standing thereupon and more particularly described in the schedule of property hereunder written, hereinafter referred to as **SAID PROPERTY** and with these representations has agreed to grant the development rights of the said property to **M/S. MAHESH BORKAR CIVIL ENGINEERS AND CONTRACTORS**.

In the circumstances, in order to investigate the right, title and interest of said society, upon the said property and/or to investigate title of the said property, this notice is being published;

In case if anybody is having any claims, rights, title, and interest of any nature whatsoever in any capacity whatsoever in, upon or over the said property or any portion thereof, then the same may be intimated in writing with documentary proof to the undersigned within 14 days from the date of publication hereof. Failing which it shall be presumed that nobody has any claims or rights upon the said property and with such presumption further process of certification of title and execution of required registered documents shall be completed.

**SCHEDULE OF PROPERTY**

All that pieces and parcels of plots of land bearing **Final Plot No.292, T.P.S. No.1, Survey No.344/6(Part) admeasuring 1128.4 sq.meters** together with building standing thereon known as Thane Shivam Co-operative Housing Society, consisting of ground plus 4 upper floors and comprising of 17 self-contained flats and 4 shops lying, being and situate at, Village Panchpakhadi, Thane (W)-400602 within the limits of Municipal Corporation for the City of Thane, registration district and sub-district Thane and bounded as follows:-

On or towards East : Avinash CHS
On or towards West : 40 ft Road/Krupanidhi CHS
On or towards South : 20 ft Road,Panchpakhadi Jewels
On or towards North : Vacant Plot

Hence this Public Notice.

Thane.
Dated: 21/10/2021

Rashmi Nitin Chavan Telang
Advocate
58/503, Audumber CHS, Vasant Vihar,
Thane(W) 400610

## जाहिर नोटीस

तमाम लोकांना या नोटीसी द्वारे कळविण्यांत येते कि, मि, खालील सही करणारा श्री.वसंत मालु जाधव वय –६३ वर्षे,, रा.रोहिदास वाडा,मुरबाड, पो.ता.मुरबाड जि.ठाणे,आज रोजी या सत्यप्रतिज्ञा पत्राद्वारे असे लिहून देतो कि,माझे नावे मुरबाड नगरपंचायत हद्दीत माझे मालकीची व कब्जेवहीवाटीची मुरबाड नगरपंचायत दफ्तरी नोंद असलेली नगरपंचायत मालमत्ता घर क्रमांक ९६९ व.९७१ ह्या मिळकती असुन, आजरोजी मि , माझा मुलगा, श्री. नंदकुमार वसंत जाधव यास संमती पत्राद्वारे कायम स्वरुपी देत असुन, सदर दोन्ही घरांच्या घरपट्टी, व अँसेसमेंट उतारा श्री.नंदकुमार वसंत जाधव याचे नावे होण्यास माझी कुठल्याही प्रकारची हरकत किंवा तक्रार नसून ’ समंतीच आहे. तसे मा.तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी मुरबाड यांचे समोर सत्य प्रतिज्ञापत्राद्वारे लिहून देत आहे. तरी ,सदर मालमत्ता ९६९ व ९७१ ह्या मालमत्ता त्याचे नावे नगर पंचायत दफ्तरी नोंद होवून त्यांची घरपट्टी, व अँसेसमेंट उतारा, त्याचे नावे करण्यात यावे. याबाबत कोणाची काही हरकत असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाले पासुन आठ दिवसांचे आत लेखी कागदपत्रे पुराव्यासह निदर्शनास आणून देणे.तद्रंतर कोणाची कसलीही तक्रार अथवा हरकत ग्राह्य धरली जाणार नाही. याची नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.हि विनंती..कळावे.

**आपले विश्वासु**
**सही/–**
**१)श्री.वसंत मालु जाधव**
**लिहून देणार**
**२)श्री.नंदकुमार वसंत जाधव**
**लिहून घेणार**

## जाहिर नोटीस

तमाम लोकांना या नोटीसी द्वारे कळविण्यांत येते कि, मि, खालील सही करणारी सौ.तुळसाबाई वसंत जाधव वय –५९ वर्षे,, रा.रोहिदास वाडा,मुरबाड, पो. ता.मुरबाड जि.ठाणे,आज रोजी या सत्यप्रतिज्ञा पत्राद्वारे असे लिहून देते कि,माझे नावे मुरबाड नगरपंचायत हद्दीत माझे मालकीची व कब्जेवहीवाटीची मुरबाड नगरपंचायत दफ्तरी नोंद असलेली नगरपंचायत मालमत्ता घर क्रमांक ९७० हि, मिळकत असुन, आजरोजी मि , माझा मुलगा, श्री. नंदकुमार वसंत जाधव यास संमती पत्राद्वारे कायम स्वरुपी देत असुन, सदर घराची घरपट्टी, व अँसेसमेंट उतारा श्री.नंदकुमार वसंत जाधव याचे नावे होण्यास माझी कुठल्याही प्रकारची हरकत किंवा तक्रार नसून ’ समंतीच आहे. तसे मा.तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी मुरबाड यांचे समोर सत्य प्रतिज्ञापत्राद्वारे लिहून देत आहे. तरी ,सदर मालमत्ता ९७० हि ,मालमत्ता त्याचे नावे नगर पंचायत दफ्तरी नोंद होवून त्याची घरपट्टी, व अँसेसमेंट उतारा, श्री. नंदकुमार वसंत जाधव याचे नावे करण्यात यावे. याबाबत कोणाची काही हरकत असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाले पासुन आठ दिवसांचे आत लेखी कागदपत्रे पुराव्यासह निदर्शनास आणून देणे.तद्रंतर कोणाची कसलीही तक्रार अथवा हरकत ग्राह्य धरली जाणार नाही. याची नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.हि विनंती..कळावे.

**आपली विश्वासु**
**सही /–**
**१)सौ.तुळसाबाई वसंत जाधव**
**लिहून देणार**
**२)श्री.नंदकुमार वसंत जाधव**
**लिहून घेणार**

## जाहीर नोटीस

**वकील पी.एच.पाटील**
**ॲड. मुकुंद संखे**

**ठाणे येथील दिवाणी न्यायाधिश (कनिष्ठ स्तर) यांचे न्यायालयात**

चौकशी अर्ज क्र. १२१४/२०२१ निशाणी नं.

१) श्री. मधुकर आत्माराम नाईक
वय : ५६ वर्षे, व्यवसाय :
२) श्री. सुनिल आत्माराम नाईक, वय ५० वर्षे
३) सौ. उषा प्रभाकर पाटील, वय --वर्षे,
४) सौ. जयमाला अविनाश म्हात्रे, वय--वर्षे,
नं. १ व २ रा– १२एम चंद्रमा, कोपरखैरणे, ..... **अर्जदार**
नवी मुंबई नं. ३, ४ घणसोली नं. ४, करावे, नवी मुंबई

वरील अर्जदारांचे वडिल कै. आत्माराम काळूराम नाईक यांचे दिनांक १८/०५/२०२१ रोजी नवी मुंबई येथे निधन झाले. मयत कै. आत्माराम काळूराम नाईक यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

(ND --- 27/10/21)
1) Village
Kopar Khairne Sector 5,00,000/-
House No. 1097 KBA Five Lakhs
Navi Mumbai, Maharashtra Node
House No. 1134 R.C.C.
Total 10,00,000/- Ten Lakhs

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदाराच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक -----२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यांनिशी दिली.

**सही/– लिपिक** — शिक्का — **हुकूमावरून सही/– सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, ठाणे


## CLASSIFIEDS ठाणेवैभव

**छोट्या जाहिरातींसाठी संपर्क कार्यालय**
**ठाणे - २५३४१५२६/२५३४८५९४**

**ऑफिस भाड्याने देणे आहे**
टोटल कार्पेट एरिया, ११५८.६७ स्क्वे.फु., ३ कॅबिन, १ रिसेप्शन, १ पॅन्ट्री, २ बाथरूम टेरेस सोबत शिवनेरी बिल्डिंग, पहिला माळा, गावदेवी, ठाणे रेल्वे स्टेशनजवळ. ८९७६८२३७५२

**विकणे आहे**
टेंभी नाका परिसरात २०० आणि २५० चौ.फूटाचा बेसमेंट गाले विकायला आहे.
संपर्क – ९८१९२४९२८०

**पाहिजेत**
नामांकित रक्तपेढीसाठी डिलेव्हरीसाठी (बाईक असणाऱ्यास प्राधान्य) मुले पाहिजेत. पत्ता – ब्लडलाईन ब्लड बँक, आंबेडकर रोड, खोपट, ठाणे (प)
संपर्क – ०२२–२५३७५०००/ ६०००

**'ठाणेवैभव' दैनिकातील जाहिराती या जाहिरातदारांनी दिलेल्या मजकुरानुसार छापल्या जातात. या मजकुराच्या सत्यतेबाबतची खातरजमा वाचकांनी स्वतःच्या जबाबदारीवर करावयाची आहे. 'ठाणेवैभव' यांचा याबाबत कोणतीही आर्थिक वा कायदेशीर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष जबाबदारी राहणार नाही.**

**हात स्वच्छ धुवा कोरोना टाळा**

# अंबरनाथ-बदलापूर वैभव



आम्हा घरी धन | शब्दांचीच रत्ने |
शब्दांचीच शस्त्रे | यत्ने करु ||

## मौनाचा आक्रोश कोणी ऐकेल का?

ज्या नगरपालिकेत आपण नियमित कर भरतो ती जर दैनंदिन नागरी सुविधांबाबत हेळसांड करीत असेल तर करदात्यांनी आवाज उठवायलाच हवा. परंतु गेल्या अनेक वर्षांचा अनुभव लक्षात घेता हा आवाज संबंधितांपर्यंत पोहोचतच नाही आणि त्यामुळे तो क्षिण होत गेला. ही परिस्थिती प्रशासन आणि लोकप्रतिनिधींच्या पथ्यावर पडत असते, पण आवाज वाढवण्याचा एकत्रित प्रयत्न खचितच होत नाही. डोंबिवलीतील नागरिकांनी मूक मोर्चा काढून आपला आवाजह संबंधितांपर्यंत पोहोचवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या या शांततेचा योग्य अर्थ काढून प्रशासन वा लोकप्रतिनिधी कामाला लागतील ही अपेक्षा.

प्रत्येक शहरात नागरिकांचा एक दबाव गट असावा असे वारंवार बोलले जात असते. तत्वतः त्याबद्दल दुमत असायचे कारण नाही. परंतु राजकारणात ओतप्रोत चिंब भिजलेल्या मंडळींना अपक्ष अशा दबाव गटातूनही राजकीय वास येऊ लागतो. दबाव गट म्हणजे विरोधकांचे कारस्थान अशी संभावना करून संबंधित मंडळी स्वःताच्या कर्तव्याकडे पाठ फिरवत असतात. आपल्या आवाजाची दखल घेतली जात नाही, किंबहुना सारेच पक्ष आपल्याकडे दुर्लक्ष करतात असा निष्कर्ष काढून दबाव गटाला नामोहरम होऊन आपसुक विसर्जित होऊन जातो. अशा वेळी जनतेचा पराभव होत असतो. आपण ज्यांना मत दिले ती निवड चुकीची असल्याची उपरती त्यांना होत असते.परंतु तरीही जनता एकत्र येत नाही. ही उदासिनता डंपिंग ग्राऊंडवरील कचर्याच्या ढिगाप्रमाणे साचत चालली आहे. डोंबिवलीकर मौनाच्या भाषेने कारभारकर्त्यांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करीत आहे. राजकीय पक्षांमध्ये जी काही उरली सुरली सदसद्विवेक बुद्धी शिल्लक आहे तिचा आदर करून त्यांनी मौनाचा हा आक्रोश लक्षात घ्यायला हवा. त्यातून राजकीय अन्वायर्थ काढून आपल्या अकार्यक्षमतेवर सबबींचे पांघरूण घालता कामा नये.

गेल्या आठवड्यात डोंबिवली आणि कल्याण भागात जाण्याचा योग आला. रस्त्यांवरील खड्डे अतिक्रमणे, वाहतुकीची बेशिस्त, कचऱ्याचे ढीग आदी प्रकार पाहून या शहरातील जनतेचा संयम सुटला नाही तरच नवल. बजबजपुरी आणि बकालपणा यांचे ठायीठायी दर्शन झाले. हे चित्र पहाता जनता रस्त्यावर उतरली असेल तर पुढार्यांनी आणि प्रशासनाने आपापले राजकीय चष्मे काढून या आंदोलनाची गंभीर दखल घ्यावी यातच शहाणपणा आहे.

## महाविकास आघाडी न झाल्यास बदलापुरात राष्ट्रवादी स्वबळावर





**बदलापूर: कुळगाव-बदलापूर नगर पालिकेच्या आगामी निवडणुकीत महाविकास आघाडी व्हावी, यासाठी राष्ट्रवादी प्रयत्न करणार आहे. मात्र काही कारणास्तव आघाडी झाली नाही तर स्वबळावर लढण्याचीही राष्ट्रवादीची तयारी असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सचिव कालिदास देशमुख यांनी स्पष्ट केले.**

बदलापूरातील काटदरे मंगल कार्यालयात आयोजित राष्ट्रवादीच्या कार्यकर्ता मेळाव्यात कार्यकर्त्यांशी संवाद साधताना कालिदास देशमुख यांनी स्वबळाबाबत भूमिका मांडली. प्रदेश सरचिटणीस दर्शना दामले, प्रियंका दामले, अनघा वारंग, हेमंत रुमणे, राम लिये, अनिल मराडे, जीतेंद्र पाटील, हेमंत यशवंतराव, सेवक देशमुख, निलेश थिटे आदींसह राष्ट्रवादीचे अनेक पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते.

राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांनी पालिका निवडणुकीसाठी महाविकास आघाडी होण्याचे संकेत दिले असल्याचेही देशमुख यांनी स्पष्ट केले. माजी नगरसेवक प्रभाकर पाटील यांनी शहरात काही लोकांची दहशत असल्याचे सांगून निवडणूक काळात कुणाच्याही दहशतीला घाबरु नका, असे आवाहन केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व आम्ही सर्व कार्यकर्त्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहू, अशी ग्वाही त्यांनी दिली. आतापासूनच मतदार याद्यांचा अभ्यास करा, जोमाने तयारीला लागा, अशा सूचना त्यांनी कार्यकर्त्यांना केल्या. धनंजय सुर्वे यांनी बदलापूरच्या विकासात शिवसेनाच नव्हे तर राष्ट्रवादीचेही योगदान असल्याचे सांगून कार्यकर्त्यांनी सर्वच्या सर्व जागा लढविण्याच्या तयारीने कामाला लागावे, असे आवाहन केले.

वर्षभरात तीन हजार महिलांना रोजगार

राष्ट्रवादीच्या महिला प्रदेश सरचिटणीस दर्शना दामले यांच्या प्रयत्नांमुळे यशस्विनी भवनच्या माध्यमातून अनेक महिलांना रोजगार मिळाला आहे. वर्षभरात अशा तीन हजार महिलांना राष्ट्रवादीच्या माध्यमातून व्यवसाय प्रशिक्षण देऊन रोजगार उपलब्ध करून देण्याचा मानस प्रियंका दामले यांनी व्यक्त केला.

## नगरोत्थानमधील निधीमुळे बदलापूरचे रस्ते सिमेंटचे



**बदलापूर: नगरोत्थानमधून दीड कोटींचा निधी मिळाल्याने बदलापूर शहरातील बहुतेक सर्वच रस्त्यांचे काँक्रिटीकरण झाले, त्याचबरोबर शहराच्या विकासासाठी भाजपा प्रयत्नशील असल्याचा दावा आमदार किसन कथोरे यांनी केला.**

एरंजाड ते चिकणपाडा या रस्त्याच्या काँक्रीटीकरणाच्या कामाचे नुकतेच आमदार कथोरे यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोट्यवधी रुपयांचा निधी देऊन बदलापूरच्या विकासाला दिशा देण्याचा प्रयत्न केला. त्यातूनच या रस्त्याच्या काँक्रिटीकरण कामासाठीही नगरोत्थान अंतर्गत दीड कोटी रुपयांचा निधी मिळाला असल्याचे आमदार कथोरे यांनी सांगितले.

माजी नगराध्यक्ष राजेंद्र घोरपडे, माजी नगरसेवक हेमंत चतुरे, स्वामी दारविन आदींसह भाजपाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. रस्त्याचे लवकरात लवकर काँक्रिटीकरण व्हावे यासाठी माजी नगरसेवक हेमंत चतुरे प्रयत्नशील होते.

## अंबरनाथ ऑर्डीनन्सचे नाव आता युनिट ऑफ यंत्र इंडिया

**अंबरनाथ: गेल्या अनेक वर्षांपासून अंबरनाथमध्ये असलेला आयुध निर्माणी (ऑर्डीनन्स) कारखान्याला नवीन ओळख मिळाली असून यापुढे 'युनिट ऑफ यंत्र इंडिया लिमिटेड' या नावाने हा कारखाना ओळखला जाणार आहे. असे नामकरण करण्यात आले आहे.**

अंबरनाथमधील दोन आयुध निर्माण कंपन्या आयुध निर्माणी बोर्डाच्या आधिपत्यातून बाहेर पडले असून या कंपन्यांसाठी स्वतंत्र महामंडळाची स्थापना करण्यात आली असल्याची माहिती आयुध निर्माणी कारखान्याचे अधिकारी पी. के. गुप्ता यांनी दिली

अंबरनाथ येथे आयुध निर्माणी बोर्डाच्या अखत्यारीत असलेल्या आयुध निर्माणी अंबरनाथ आणि मशीन टूल प्रोटोटाईप फॅक्टरी दोन कंपन्या आहेत. देशातील 41 आयुध निर्माणी कारखान्यांचे सात महामंडळामध्ये वर्गीकरण करण्यात आले आहे. नव्याने स्थानपण केलेल्या सात महामंडळच्या माध्यमातून देशातील आयुध निर्माणी कारखान्यांचे कामकाज पाहिले जाणार आहे.

महामंडळ स्थापन करण्यामुळे कंपनीची कार्यशैली बदलण्यास मदत होणार आहे. उत्पादन क्षमता वाढवण्यास मदत होणार असल्याचा विश्वास कंपनीचे अधिकारी गुप्ता यांनी दिली. कालानुरुप बदल होणे ही गरज असून आयुध निर्माणी कंपन्यांचे फक्त महामंडळात रूपांतरित करण्यात आले आहे. त्याचा कामगारांच्या नोकरीवर आणि त्यांच्या इतर सुविधांवर कोणताही परिणाम होणार नसल्याची माहिती श्री. गुप्ता यांनी दिली. आयुध निर्माणी कारखान्याचे कामकाज करताना पूर्वी अनेक मंजुऱ्या घ्याव्या लागत होत्या मात्र आता तत्काळ कामकाज करता येणार असल्याचा दावा श्री. गुप्ता यांनी केला. अंबरनाथमधील दुसरी कंपनी मशीन टूल प्रोटोटाईप (एम टी पी एफ) कंपनी सुद्धा आता 'आर्मड व्हेइकल्स महामंडळ लिमिटेड असे करण्यात आले आहे.

## केबल-इंटरनेट सेवा पुरवणाऱ्या ४०० कर्मचाऱ्यांचे लसीकरण

अंबरनाथ: केबल आणि इंटरनेट सेवा पुरवणाऱ्या सुमारे 400 सदस्यांना आज कोरोना प्रतिबंधक लस देण्यात आली.

अत्यावश्यक सेवेमध्ये समावेश असलेल्या इंटरनेट आणि केबल व्यवसायिकांना लसीकरणापासून वंचित रहावे लागले होते. ही समस्या लक्षात घेऊन येथील डेन एबीसी केबलचे संचालक अनिल गायकवाड यांनी रुग्णालयात विशेष लसीकरण मोहीम आयोजित केली होती. या मोहिमेत चारशेहून अधिक नागरिकांनी या लसीकरणाचा लाभ घेतला.

कोरोना काळात जीव धोक्यात घालून अंबरनाथमधील केबल व्यवसायिक आणि इंटरनेट सेवा पुरवणाऱ्यांनी अखंडित सेवा दिली होती. शासनाने देखील केबल आणि इंटरनेट सेवा पुरवणाऱ्यांना अत्यावश्यक सेवेमध्ये सामावून घेतले होते. मात्र लसीकरण मोहीम सुरु झाल्यावर लस घेण्यासाठी केबल आणि इंटरनेट सेवा पुरवणा-यांना मोठी कसरत करावी लागत होती. ही सेवा पुरवीत असतांना हजारो नागरिकांच्या घरी जावे लागत असल्याने कोरोणाचा संसर्ग होण्याचा धोका देखील निर्माण झाला होता.

ही समस्या लक्षात घेत संचालक अनिल गायकवाड यांनी छाया ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. शशिकांत दोडे यांच्याकडे केबल आणि इंटरनेट सेवा पुरविणाऱ्यांसाठी विशेष लसीकरण मोहीम राबवण्याची मागणी केली होती. बुधवारी छाया ग्रामीण रुग्णालयात विशेष लसीकरण मोहीम राबविण्यात आली. लस घेण्यासाठी गर्दी केली. केबल आणि इंटरनेट क्षेत्रातील कर्मचाऱ्यांनी आणि त्यांच्या परिवारातील तब्बल चारशेहून अधिक सदस्यांनी लसीकरणाचा लाभ घेतला.

## मोरीवली माध्यमिक विद्यालयात मोफत इंटरनेट सेवा

### विद्यार्थी घेणार डिजिटल शिक्षण

**अंबरनाथ: अंबरनाथ नगरपालिकेच्या मोरीवली येथील माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना मोफत डिजिटल शिक्षण मिळणार आहे.**

कोरोनाच्या संकटांनंतर आठवी ते दहावीपर्यंत माध्यमिक शाळा सुरु झाल्याने अंबरनाथ पालिकेच्या मोरवली माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांनी शाळेत नियमित येण्यास सुरुवात केली आहे. मात्र या शाळेत संगणक विभाग आणि डिजिटल क्लास रुममध्ये इंटरनेट सेवा नसल्याने त्याचा लाभ विद्यार्थ्यांना मिळत नव्हता. शाळेतील इंटरनेटची गैरसोय लक्षात घेऊन साईप्रसाद इंटरनेट नेटवर्कचे संचालक अनिल गायकवाड यांनी मोरीवली शाळेला संपूर्ण इंटरनेट सेवा मोफत दिली आहे. इंटरनेट सेवा सुरु झाल्याने आता या विद्यार्थ्यांच्या डिजिटल शिक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे.

नगरपालिकेच्या मोरीवली शाळेत शासनाच्या नियमानुसार याठिकाणी आठवी ते दहावीचे वर्ग भरवण्यात आले आहेत. विद्यार्थी देखील उत्साहाने वर्गात येत असून पटसंख्या देखील वाढत आहे. मात्र शाळा सुरु झाल्यापासून शाळेतील संपूर्ण इंटरनेट सेवा बंद असल्याने शिक्षक, शाळा प्रशासन आणि विद्यार्थी या सर्वांचीच गैरसोय होत होती. तसेच विद्यार्थ्यांना संगणक विभागात प्रशिक्षण घेणे अवघड जात होते. डिजिटल क्लास रुममध्ये देखील इंटरनेट सेवे अभावी वर्ग बंद ठेवण्याची वेळ येत होती.

याबाबतची माहिती साईप्रसाद इंटरनेटवर्कचे अनिल गायकवाड यांना मिळताच गायकवाड यांनी संपूर्ण शाळेत इंटरनेट सेवा तत्काळ सुरु केली आहे. तसेच या इंटरनेट सेवेचे कुठलेही शुल्क शाळेकडून आकारले जाणार नसल्याचे सांगितले. मोफत इंटरनेट सेवा मिळाल्याने विद्यार्थ्यांनी देखील समाधान व्यक्त केले आहे तर शाळा प्रशासनाला देखील कार्यालयीन कामकाजात येणारा अडथळा दूर होण्यास मदत झाली आहे.

विद्यार्थ्यांना चांगल्या पद्धतीचे आधुनिक पद्धतीचे शिक्षण घेता यावे यासाठी इंटरनेट सेवा पुरवण्यात आली आहे, अशी माहिती अनिल गायकवाड यांनी दिली.

## अंबरनाथला 13 वाणिज्य गाळ्यांवर कारवाई

**अंबरनाथ: अंबरनाथच्या पश्चिमेकडील कोहोजगाव आणि परिसरात नगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाने 13 वाणिज्य गाळ्यांवर धडक कारवाई करून जमीनदोस्त करण्यात आले.**

नगरपालिकेचे अतिरिक्त मुख्याधिकारी डॉ. धीरज चव्हाण त्याचप्रमाणे उप मुख्याधिकारी संदीप कांबळे, अतिक्रमण विभागाचे अधिकारी नरेंद्र संख्ये यांच्यासह कर्मचाऱ्यांनी विकास आराखड्यातील रस्त्याच्या बाजूला बांधण्यात आलेल्या गाळ्यांवर आज गुरुवारी पोलीस बंदोबस्तात जेसीबीच्या सहाय्याने कारवाई केली. या धडक कारवाईमुळे अतिक्रम करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.



## महिला शिक्षकांच्या ऑनलाइन राज्यस्तरीय मुक्तांगण व्यासपीठाची यशस्वी वर्षपूर्ती




अंबरनाथ: मागील दीड वर्षांपासून कोरोनासारख्या भयानक परिस्थितीने सर्वत्र भीतीदायक वातावरण होते. शैक्षणिक क्षेत्रातही त्याचे तीव्र पडसाद उमटले होते. अशावेळी कुटुंबामध्ये असणाऱ्या शिक्षिकांनी कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडताना समाधानी राहून स्वअंतर्गत कलागुणांना वाव मिळावा या संकल्पनेतून बदलापूर नगरपालिका शाळ तील शिक्षिका डॉ. जयश्री मोरे-काळे यांनी सुरु केलेल्या मुक्तांगण व्यासपीठ ऑनलाईन समूह व्यासपीठाला 19 ऑक्टोबर रोजी वर्ष पूर्ण झाले. या उपक्रमात राज्यातील 20 जिल्ह्यातील 256 शिक्षिकांनी आपला सहभाग नोंदवून कलागुणांना वाव दिला.

कोरोनाच्या कठीण काळात शिक्षकांना येणारा ताण-तणाव त्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याला इजा पोहोचविणारा होता. कोरोनाशी लढा देत विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात ठेवण्याचा प्रयत्न व्यासपीठाच्या माध्यमातून सुरु होते. अशा नाजूक परिस्थितीमध्ये महिला शिक्षकांच्या आनंद, समाधान आणि स्वअंतर्गत कलागुणांना व्यक्त करण्याची संधी मिळावी व ताणतणावातून स्वतःसाठी त्यांनी विचार करावा या उद्देशाने राज्यस्तरावर विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचे ठरविले. यामध्ये . मेहंदी स्पर्धा, गीत गायन स्पर्धा, वेशभूषा स्पर्धा (स्व अंतर्गत ती), निबंध लेखन स्पर्धा, रांगोळी व चारोळी स्पर्धा, पेंटिंग स्पर्धा, संस्कार भारती ऑनलाइन कार्यशाळा, राज्यस्तरीय काव्य संमेलन (30-कवयत्रींचा सहभाग),आरोग्यम् धनसंपदा (योगा), नृत्य कलाविष्कार, जागतिक पर्यावरण दिनानिमित्त, घोषवाक्य लेखन, कविता लेखन, वृक्षारोपण कार्यक्रम, आषाढी एकादशी-भक्तीमय रांगोळी राज्यस्तरीय प्रकल्पाअंतर्गत नाविन्यपूर्ण उपक्रम अशाप्रकारे 14 ऊपक्रम हे कलाकौशल्य बेस उपक्रम झाले असून त्यापुढील उपक्रम हे चर्चासत्र परिसंवाद, एनइपी-2020, सर्जनशील उपक्रम व अध्ययन- अध्यापन, व्याख्यानमाला शैक्षणिक नॉलेज बेस उपक्रम आयोजित आहेत.

ठाणे शिक्षणाधिकारी सौ.दहिदुले, जिल्हा व प्रशिक्षण संस्था राहटोली सेवानिवृत्त प्राचार्या विजया चिंचोलकर, अधिव्याख्याता वैशाली बच्छाव, अंबरनाथ पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी शीतल कदम, बदलापूर नगरपालिका केंद्रपप्रमुख भावना घोलप, मुख्याध्यपिका माधुरी खाचणे, सौ.तांदळे आदींनी विविध उपक्रमांमध्ये उपस्थित राहून सर्व महिला शिक्षकांना प्रोत्साहन दिले. त्यांच्या हस्ते उपक्रमात व विविध स्पर्धांमध्ये विजयी महिला शिक्षिकांना सन्मानपत्र देऊन प्रोत्साहन देण्यात आले.

या राज्यस्तरीय प्रकल्पामध्ये प्रत्येक जिल्हाप्रमुख सखी त्या-त्या जिल्ह्यातील शिक्षक सख्यांच्या मदतीने नाविन्यपूर्ण राज्यस्तरीय उपक्रम प्रत्येक महिन्यामध्ये राबविला. शिक्षिकांना ऑनलाइन राज्यस्तरीय उपक्रम राबवण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली.

या प्रकल्पाअंतर्गत ठाणे जिल्हाप्रमुख प्रशाली मुळे, सौ. वराडे, माधवी धांडे आणि सातारा जिल्हाप्रमुख साधना दुधाळ यांनी चार उपक्रम प्रभावीपणे यशस्वी पार पडले आहेत. हा प्रकल्प 20 महिने 20 जिल्ह्यांमध्ये राबविला जाणार आहे.

या उपक्रमात अंबरनाथ नगरपालिकेच्या शिक्षिका वंदना भागवत, आणि सातारा जिल्ह्याच्या सहशिक्षिका शीतल शिंदे यांचे सहकार्य लाभल्याचे डॉ. मोरे यांनी नमूद केले.

## अंबरनाथला स्वतंत्र पाणीपुरवठा; योजना राबवण्याची काँग्रेसची मागणी

**अंबरनाथ: अंबरनाथ शहरासाठी स्वतंत्र पाणीपुरवठा योजना राबवावी, अशी मागणी अंबरनाथ ब्लॉक काँग्रेसचे अध्यक्ष प्रदीप पाटील यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे केली आहे.**

अंबरनाथ आणि बदलापूर शहरासाठी एकत्रित पाणीपुरवठा योजना असल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्याला पाण्याचे नियोजन करताना समस्यांचा सामना करावा लागतो, अंबरनाथ शहरापासून उल्हास नदी जवळ असतानादेखील अंबरनाथ शहराला बदलापूरच्या बॅरेज धरणावरुन पाणीपुरवठा करावा लागत आहे. त्यामुळे पाणी गळतीचे प्रमाण वाढले आहे, ही समस्या सोडविण्यासाठी अंबरनाथ शहरात पाणी समस्या सोडविण्यात जीवन प्राधिकरणाला अपयश येत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना पसरली आहे. यासंदर्भात नगरसेवकांकडे मोठ्या प्रमाणात तक्रारी येत आहेत. असे असताना देखील प्राधिकरणाचे काही अधिकारी नागरिकांशी उद्धट वर्तन करतात या प्रकरणी जाब विचारण्यासाठी आज अंबरनाथ ब्लॉक कांग्रेस अध्यक्ष प्रदीप पाटील यांनी आज जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता मिलिंद बसनगर यांची भेट घेतली.

## टिटवाळ्यात आढळला मांडूळ जातीचा दुर्मिळ साप





कल्याण : मांडा टिटवाळ्याच्या पश्चिम भागात असणाऱ्या माऊली कृपा सोसायटीत मांडूळ जातीचा दुर्मिळ साप आढळून आल्याने त्याला पाहण्यासाठी परिसरात एकच गर्दी उसळली होती.

या सापाला देश विदेशात प्रचंड मागणी आहे. या सापाची कोट्यवधी रुपयांना बेकायदेशीरपणे तस्करी केली जाते. या सापामुळे अनेक दुर्धर आजार बरे होतात असा समज आहे. मंत्र तंत्राचा वापर करून पैशांचा पाऊस या सापाच्या आधारे पाडता येतो अशी देखील अंधश्रद्धा समाजात आहे. त्यामुळे अनेकदा अंधश्रद्धेतून या मुक्या प्राण्याचा हकनाक बळी दिला जातो. मात्र, याच दुर्मिळ मांडूळ जातीच्या सापाचे वॉर या प्राणी मित्र संस्थेचे सदस्य सर्पमित्र निखील कांबळे यांनी प्राण वाचवत त्याला जीवनदान दिले आहे.

मांडा टिटवाळ्याच्या पश्चिम भागांतील माऊली कृपा सोसायटीत स्थानिक नागरिकांकडून साप आढळून आल्याची माहिती मिळताच सर्पमित्र यांनी तातडीने या ठिकाणी धाव घेतली आणि सापाला सुरक्षितपणे हाताळून ताब्यात घेतले त्याचबरोबर त्या ठिकाणी जमलेल्या नागरिकांना या सापाविषयी माहिती देत त्या विषयी समाजात चुकीच्या पसरवण्यात आलेल्या अंधश्रद्धा याबाबत माहिती दिली व वनविभागाच्या ताब्यात या सापाला दिले.

# उल्हासनगर पालिका कर्मचाऱ्यांना 15 हजार रुपये दिवाळी बोनस



**उल्हासनगर: महापौर लिलाबाई आशान यांच्या अध्यक्षतेखाली कामगार नेत्यांसोबत पार पडलेल्या बैठकीत उल्हासनगर महापालिकेतील कर्मचाऱ्यांना 15 हजार रुपये दिवाळी बोनस देण्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे.**

मागच्या वर्षी कोरोनाचा काळ असल्याने कर्मचाऱ्यांना 12 हजार 500 रुपये देण्यात आला होता. त्यात आज दोन हजार 500 रुपयांची वाढ करून 15 हजार रुपये दिवाळी बोनस जाहीर झाला आहे.

या बैठकीला महापौर लिलाबाई आशान, आयुक्त डॉ.राजा दयानिधी, शिवसेना नगरसेवक राजेंद्रसिंह भुल्लर, अरुण आशान, स्थायी समिती सभापती टोनी सिरवानी, सभागृहनेते भारत गंगोत्री, विरोधी पक्षनेते किशोर वनवारी, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रोहित साळवे, कामगार नेते शाम गायकवाड, दिलीप थोरात, राधाकृष्ण साठे, दीपक दाभणे, आसेराम टाक, मुख्य लेखाधिकारी विकास चव्हाण उपस्थित होते.

पालिकेत 2400 कर्मचारी असून प्रत्येकी 15 हजार रुपये दिवाळी बोनस देण्यात येणार असल्याने पालिकेवर तीन कोटी 60 लाख रुपयांचा बोजा पडणार असल्याचे मुख्य लेखाधिकारी विकास चव्हाण यांनी सांगितले.



**ठाण्यात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांचा हस्ते टिप टॉप हॉटेलमध्ये भगवान महर्षि वाल्मीकी प्रकट दिवस उत्सव जयंती साजरी करण्यात आली. सोबत केंद्रीय पंचायत राज्यमंत्री कपिल पाटील, भाजपचे ठाणे शहर जिल्हा अध्यक्ष आमदार निरंजन डावखरे, ठाणे विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय केळकर, प्रदेश सचिव संदीप लेले, ठाणे महापालिकेतील भाजपचे गटनेते मनोहर डुंबरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन अनुसूचित जाती मोर्चा ठाणे शहर जिल्हा अध्यक्ष विरसिह पारछा आणि पदाधिकारी यांनी केले. विषेश योगदान ओबीसी मोर्चा ठाणे शहर जिल्हा अध्यक्ष सचिन केदारी यांनी दिले.**

## डोंबिवलीजवळील आजदेपाड्यात तीव्र पाणीटंचाई

**डोंबिवली : 27 गावे कल्याण –डोंबिवली महानगरपालिकेत समाविष्ट होऊन पाच वर्ष उलटूनही येथील पाणी समस्या सुटली नाही. पाणी वितरण व्यवस्था समान असणे आवश्यक असताना वितरण व्यवस्था सुरळीत नसल्याने नागरीक पुरते वैतागले आहेत.**

डोंबिवली पूर्वेकडील आजदेपाडा येथे रहिवाश्यांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. येथील भराडी आई बिल्डींगमध्ये पाणी येत नसल्याने येथील रहिवाशी पालिका प्रशासनाला जाब विचारणार आहेत. येथील पाणी प्रश्न न सुटल्यास रहिवाशी आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत.

आजदेपाडा येथील अनेक इमारतीत तीन तास पाणी वितरण केले जाते. मात्र आता येथील पालिका कर्मचारी येथील इमारतींना पाणी सोडताना फेरफार करत असल्याचे बोलले जाते आहे. ठराविक कर्मचाऱ्यांना हे काम न देता त्याजागी दुसऱ्या कर्मचाऱ्याला काम द्यावे अशी मागणी होत आहे. आजदेपाडा येथील भराडी आई बिल्डींग व अन्य अनेक इमारतींना गेले महिनाभर कमी दाबाने पाणी पुरवठा केला जात आहे. पालिका प्रशासनाला कर देत असूनही पाणी मिळत नसल्याने भराडी आई बिल्डींग मधील नागरीक प्रचंड संतापले आहेत. याबाबत येथील रहिवाशी माजी नगरसेवकांच्या कार्यालयात गेले असता त्यांना पालिकेकडूनच कमी दाबाने पाणी सोडले जात असल्याचे सांगण्यात आले. याबाबत पाणी पुरवठा विभागाचे अभियंता अनंत मालगुंडी यांना विचारले असता ते म्हणाले, आजदेगाव आणि आजदेपाडा येथे पालिकेकडून व्यवस्थित पाणी सोडले जाते. त्यामुळे कमी दाबाने पाणी पुरवठा करण्याचा प्रश्नच येत नाही. दरम्यान येथील पाणी वितरण व्यवस्थेकडे पालिकेचे लक्ष नसल्याचे दिसून येत आहे. लवकरात लवकर पाणी प्रश्न सुटला नाही. पालिका कार्यालयावर मोर्चा काढण्याचा इशारा येथील नागरिकांनी दिला आहे.

## १०० टक्के करवसुलीसाठी प्रशासनाची डेडलाईन

**ठाणे : मालमत्ता कर आणि पाणी पट्टी कर वसुलीचा वेग वाढविण्याबरोबरच येत्या डिसेंबर 2021 अखेरपर्यंत 100 टक्के वसुली करण्याच्यादृष्टीने नियोजन करण्याचे कडक निर्देश महापालिका अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे यांनी सर्व सहाय्यक आयुक्त व कर निरीक्षक यांना दिले. दरम्यान प्रभाग समितीनिहाय विशेष वसुली मोहिम राबविण्यासोबतच वेळप्रसंगी कडक कारवाई करण्याचे निर्देशही त्यांनी सर्व संबंधितांना दिले.**

आज कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात झालेल्या आढावा बैठकीत बोलताना श्री. हेरवाडे यांनी मालमत्ता कर आणि पाणीपट्टी कर वसुलीचा आढावा घेतला. यावेळी माहे डिसेंबर अखेर वसुली 100 टक्के करण्याच्यादृष्टीने नियोजन करण्याचे सक्त निर्देश त्यांनी सर्व संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांना दिले.

आज अखेर अंदाजे 355.46 कोटी रुपये मालमत्ता कराच्या स्वरुपात वसुली झाली आहे. सदरची वसुली ही निर्धारित इष्टांकाच्या 48 टक्केपेक्षा जास्त झाली आहे. जवळपास 5.47 लक्ष मालमत्ता कराची देयके वितरित करण्यात आलेली आहेत. महापालिकेच्या एकूण 176 ब्लॉकमधील सर्वच नागरिकांनी मालमत्ता कर भरावा यासाठी प्रभाग समिती निहाय विशेष वसुली मोहिम राबविण्याच्या सूचना श्री. हेरवाडे यांनी सर्व अधिका-यांना दिल्या. त्याचप्रमाणे ब्लॉकनिहाय थकबाकीदारांची यादी तयार करून त्यांच्याकडून वसुली करण्याला प्राधान्य देण्याच्या सूचना देतानाच पहिल्या सहामाहीमधील थकबाकीदारांकडील वसुली करण्यावर भर देण्याबाबत श्री. हेरवाडे यांनी स्पष्ट केले.

दरम्यान अस्तित्वातील मालमत्तांची वसुली करण्याबरोबरच नवीन मालमत्तांची कर आकारणी करून तसे प्रमाणपत्र संबंधित कर निरीक्षकांनी सादर करण्याचे निर्देश या बैठकीत देण्यात आले. त्याचबरोबर वापरात बदल किंवा अनिवासी भाडेतत्वावरील कर आकारणीची कार्यवाही करण्याच्या सूचना श्री. हेरवाडे यांनी दिल्या.

## महर्षी वाल्मिकी जयंतीनिमित्त विविध उपक्रम



ठाणे: भगवान महर्षि वाल्मिकी जयंतीनिमित्त ठाण्यात विविध ठिकाणी वाल्मीकी समाजाच्या गरीब महिलांना साड्या, प्रमाणपत्र, मास्क सॅनिटायझर वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे भाजपा राष्ट्रीय अनुसूचित जाती मोर्चा सरचिटणीस महाराष्ट्र प्रभारी व माजी खासदार महंत शंभुनाथ तूंडीया यांचा प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी ठाणे शहर जिल्हा अध्यक्ष आमदार निरंजन डावखरे, ठाणे शहर विधानसभा आमदार संजय केळकर, अनुसूचित जाती मोर्चा मुंबई प्रदेश अध्यक्ष शरद कांबळे, राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य अशोक खरातमल, प्रभारी दादर नगर हवेली दिव-दमण अशोक कांबळे, ठाणे शहर जिल्हा अध्यक्ष सारंग मेढेकर, भाजप ठाणे शहर उपाध्यक्ष विक्रम भोईर ठाणे शहर जिल्हा कार्यकारिणी सदस्य, रामकिशन जैस्वार, संजय गोंदवलेकर, अक्षय तिवरामकर, सिद्धांत पारछा, रमेश जाधव, रामनिवास ढिलोर, उपाध्यक्ष सुरेश बेलम, जितेंद्र चिडालीया, संदीप बिडलान, मोनु चिंडालिया, कुलदीप बिडलान, सोनु बुभक आदी कार्यकर्ते उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नियोजन विरसिह पारछा आणि पदाधिकाऱ्यांनी केले.




**वाल्मिकी जयंती निमित्त चिरागनगर, ठाणे येथे भाजपचे कार्यकारिणी सदस्य रामकिसन जैस्वार यांनी साडी व सन्मानपत्र वाटपाचे आयोजन केले होते. यावेळी आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे, राज्य सभा सदस्य शंभुनाथ फुणडीयाजी, भाजपा जिल्हाध्यक्ष सारंग मेढेकर, युवा मोर्चा अध्यक्ष विक्रम भोईर, अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्ष विरसिंग पारछा, युवा मोर्चा सरचिटणीस अक्षय तिवरामकर, स्वप्नाली साळवी, सचिन मोरे, दिनेश दाभोलकर, पराग नार्वेकर, गोविंद बनये, सिद्धांत पारछा व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.**

## अतिक्रमण कर्मचाऱ्यांना स्वरक्षणाचे धडे; ठाणे पालिकेचा पुढाकार

**ठाणे: मुजोर फेरीवाल्यांचे हल्ले रोखण्यासाठी पालिका प्रशासनाच्या वतीने अतिक्रमण विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देत, स्वरक्षणाचे धडे आज देण्यात आले. कारवाई करत असताना तेथील परिस्थितीचा आढावा घेवून मगच कारवाई करावी असा सल्ला देखील यावेळी दिला.**

ठाणे महापालिका हद्दीतील माजिवडे मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत असलेल्या कासारवडवली भागात फेरीवाल्यांवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या सहाय्यक आयुक्त कल्पिता पिंपळे यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आला होता. त्यानंतर आता पुन्हा पातलीपाडा येथे एका नारळ विक्रेत्याने चाकू हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मात्र, कर्मचारी देखील त्या हल्ल्यास विरोध करण्यासाठी एकवटल्याने त्या फेरीवाल्याने माघार घेतल्याचे दिसून आले.

ठाणे महापलिका हद्दीत अनधिकृत बांधकाम आणि फेरीवाल्यांवर कारवाईसाठी जाणाऱ्या पथकावर होणाऱ्या हल्ल्याची गांभीर्याने दखल घेत, ठाणे पालिकेचे अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे आणि अतिक्रमण उपायुक्त अश्विनी वाघमळे यांच्या मार्गदर्शनाखाली 14 ऑक्टोंबर रोजी गडकरी रंगायतन नाट्यगृहात प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले होते. यावेळी अतिक्रमण विभाग्तील 85 ते 90 अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. या अधिकारी कर्मचाऱ्यांना अतिक्रमणांवर अथवा फेरीवाल्यांवर कारवाई करण्यासाठी जातांना कोणत्या गोष्टींची खबरदारी घ्यावी, कारवाई करताना तेथील परस्थितीचा आढावा घ्यावा, जास्त लोकांची गर्दी जमलेली असल्यास त्या ठिकाणाहून माघार घ्यावी, तसेच वातावरण शांत झाल्यानंतर पुन्हा कारवाई करावी तसेच कारवाईला जातांना अधिकरी आणि कर्मचाऱ्यांनी समूहाने राहण्याचा सल्ला देखील यावेळी देण्यात आला असल्याची माहिती अतिक्रमण उपायुक्त अश्विनी वाघमळे यांनी दिली.



**राज क्रिकेट अकादमीने दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर दादोजी कोंडदेव स्टेडियममध्ये पूजा केली. यावेळी प्रशिक्षक बाळा शेट्टी यांच्याबरोबर विजय पटेल, सागर बिराजदार, हिमांशू यादव, आदित्य शेळके, प्रितम देबनाथ, काव्य जैन, किशोर चौधरी, दिया इन्ना, सौम्या पांडे, हर्षद शुक्ला, ईशीत राऊत, मनोज भांडवलकर, अजय चौहान आदी खेळाडू उपस्थित होते.**

## पंचशिल विद्यालयातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वितरण



**ठाणे: स्वच्छंद शिक्षण प्रसारक मंडळ संचलित पंचशिल विद्यालय लोकमान्य नगर पाडा नंबर 3, ठाणे येथे इ.5वी ते 10वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना ऑल कार्गोच्या नियमानुसार शैक्षणिक नियम म्हणून शिष्यवृत्ती अंतर्गत धनादेश वितरण कार्यक्रम आयोजित केला होता.**

कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून ऑल कार्गोचे प्रतिनिधी नितिन कांबळे, तृप्ती ठाकूर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सौ.एस.एच. पवार यांनी स्विकारले होते.

कार्यक्रमास मुख्य उपस्थिती म्हणून आर.टी.ओ. अधिकारी पूनम भोसले (माजी विद्यार्थीनी पंचशील विद्यालय), संस्था हितचिंतक आर. एस. पाटील (माजी शिक्षण अधिकारी टि.एम.सी.), श्री. जे. बी. लोखंडे सर(संस्था हितचिंतक) व संस्थेचे संचालक श्री. एच.बी.पवार, ठाणे वैभव छायाचित्रकार सुभाष शांताराम जैन (पत्रकार) इत्यादि उपस्थित होते.

संपूर्ण कार्यक्रमाची मुख्य जबाबदारी माध्यमिक मुख्याध्यापक श्री. एच. एन. मांदळे सर व प्राथमिक विभागाचे प्रभारी मुख्याध्यापक श्री.के.बी. बोंडे व इतर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने पार पडले. विद्यार्थी, पालक व महिला मंडळ प्रतिनिधी यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रेखा उरमोडे माध्यमिक विद्यालय यांनी केले.

## पश्चिम डोंबिवलीतील दफनभूमीवरून ग्रामस्थांची अधिकाऱ्यांशी बाचाबाची



**डोंबिवली : पश्चिम डोंबिवली देवीचापाडा येथे असलेली हिंदूंची पारंपारिक दफनभूमी अन्य समाजाला देण्याच्या पालिका प्रशासनाच्या कारभारावर स्थानिक नागरीकांनी आक्षेप घेतला. पालिकेच्या या भूमिकेला स्थानिक रहिवाश्यांनी कडाडून विरोध केला.**

गुरुवारी संध्याकाळच्या सुमारास शेकडोंच्या संख्येने जमलेल्या नागरिकांनी पाहणी करण्यासाठी आलेल्या पालिकेच्या पथकाला माघारी पाठवून दिले. देवीचा पाडा परिसरात आरक्षण क्र. 309 सी.जी. या भूखंडावर असलेल्या दफनभूमीत गेल्या शेकडो वर्षांपासून हिंदूंची वहिवाट आहे. 12-15 वयोगटातील मुलाचा मृत्यू झाल्यास त्याच्या मृतदेहावर याच दफनभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येतात. ही परंपरा गेल्या अनेक वर्षांपासून सुरु आहे. गुरुवारी संध्याकाळच्या सुमारास या दफनभूमीची पाहणी करण्याकरिता पालिकेचे मालमत्ता विभागाचे अधिकारी कमलाकर राऊत इतर कर्मचाऱ्यांसह तेथे आले. त्या जागेची पाहणी आणि मोजमाप करण्यात येत असल्याची माहिती नागरिकांना समजताच शेकडोंच्या संख्येने ग्रामस्थांनी अधिकाऱ्यांना गराडा घातला आणि याबाबत जाब विचारला.

दरम्यान पोलीस पाटील लक्ष्मीकांत भोईर, गोरखनाथ म्हात्रे, विजय भोईर, अनिल भोईर, कुणाल म्हात्रे, समीर भोईर, विकी म्हात्रे यांनी अधिकारी कमलाकर राऊत यांच्याकडे याविषयी विचारणा केली. सदर दफनभूमी महानगरपालिकेमार्फत अन्य समाजाला देण्याच्या उद्देशाने पाहणी होत असल्याचे अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांना सांगितले. मात्र प्रशासनाच्या या भूमिकेला ग्रामस्थांनी कडाडून विरोध केला. आम्हाला शांतता हवी आहे. कोणताही जातीयवाद प्रशासनाकडून करण्यात येऊ नये, जर यामुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली तर त्याला प्रशासन जबाबदार राहील असा इशारा यावेळी देण्यात आला. याबाबत देवीचापाडा ग्रामस्थ मंडळाने पालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन दिले.

सदर दफनभूमी महापालिकेमार्फत अन्य समाजाला देण्याचा उद्देश असेल तर तो आम्ही सफल होऊ देणार नाही. तरीही प्रशासनाने उद्देश पूर्ण करण्याचा प्रयत्न केल्यास जातीय तेढ निर्माण होण्यास प्रशासन जबाबदार राहिल. आणि इच्छा पालिका विरोधात ग्रामस्थांना आंदोलन पुकारावे लागेल व त्यानंतर होणाऱ्या परिणामांना पूर्णतः प्रशासन जबाबदार राहील असा इशारा देवीचापाडा ग्रामस्थ मंडळाने पत्राद्वारे दिले आहे.

याबाबत मालमत्ता विभाग उपायुक्त पल्लवी भागवत म्हणाल्या, सर्व्हे करून अहवाल सादर करण्याचे आयुक्तांनी आदेश दिले त्यानुसारच आमचे पथक त्या ठिकाणी गेले होते. आयुक्तांना तसा अहवाल सादर करण्यात येणार आहे. आयुक्त त्यावर निर्णय घेतील असेही त्यांनी सांगितले.


### प्रथम पुण्यस्मरण



**कै. शरद गणेश मळेकर**

माजी जी.एफ.ओ. बेस्ट उपक्रम, मुंबई
(जन्म : ३०/११/१९३५)
(मृत्यू : २३/१०/२०२०)

तुमच्या आठवणी शिवाय एकही क्षण जात नाही. तुमचा प्रेमाचा, आपुलकीचा, परोपकाराचा मार्ग आम्हाला प्रेरणादायी आहे.

पत्नी – संगीता शरद मळेकर
मुले–सुना – सचिन–शमिता, समीर–अस्मिता
मुलगी–जावई – शिल्पा–प्रसन्न मोहरे
नातवंडे – अक्षय, अभिषेक, ओमकार, अथर्व, आदित्यं

परिवार, कुटुंबिय व मित्रमंडळी



### मिलिंद बल्लाळ यांची चिंतनशील कादंबरी !




सतत धावणारी, कधीच न झोपणारी, आर्थिक राजधानी, मोहनगरी... मायानगरी...... स्वप्ननगरी... अंडरवर्ल्डची.... कुणालाही न कळलेली... वाहती.. झगमगाटी... काम करणाऱ्याला उपाशी झोपू न देणारी... मुंबई! रोज शेकडो लोक जिच्याकडे धाव घेतात आणि जी त्यांना आपल्या विशाल उदरात सामावून घेते... लगतच्या समुद्रासारखी... ती मुंबई! सतत आकर्षणाचा, चर्चेचा कुतूहलाचा केंद्रबिंदू असलेली... जणू काही एखादी 'अनसुलझी' पहेलीच ! 'पेव्हरब्लॉक' ही कादंबरी म्हणजे या मुंबईचं जणू आक्रंदनच आहे.

-अभिराम भडकमकर
नाटककार

**कोव्हिडनंतर आपल्या शहरांचे होणार तरी काय? ज्यांच्याबद्दल आकस आणि दुराग्रह बाळगला त्या परप्रांतीयांवर किती अवलंबून रहायचे? भूमीपुत्रांचे आणि नेत्यांचे नेमके चुकले कुठे? अनुभवाचे खडे बोल सुनावून अंजन घालणारी कादंबरी!**

या ठिकाणी उपलब्ध

अॅमेझॉन ■ मॅजेस्टीक बुक डेपो, ठाणे ■ ठाणेवैभव कार्यालयात उपलब्ध